cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-७८ | रविवार दि.०७ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वैश्विक संकटाची चाहूल चिंताजनक !

प्रशांत महासागरात आकार घेत असलेल्या एल निनोच्या प्रभावामुळे येत्या काही महिन्यांत जगभरातील हवामान व्यवस्थेत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी, अन्नधान्य तुटवडा आणि जलसंकट यांसारख्या गंभीर नैसर्गिक संकटांची तीव्रता वाढू शकते, असा इशारा जागतिक हवामान संघटनेने दिला आहे. हा इशारा केवळ हवामानशास्त्रीय अंदाज नसून संपूर्ण मानवजातीसाठी धोक्याची घंटा आहे.

# कर्जमाफीच्या आशेने कर्ज थकविणाऱ्या शेतकऱ्यांची फसगत

## » राज्यात थकबाकीदारांची संख्या चौपटीने वाढली

मुंबई । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकरी कर्जमाफीचे दिलेले आश्वासन आणि त्यानंतर वर्षभर सुरू राहिलेल्या चर्चांमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी पीक कर्जाची परतफेड टाळल्याचे चित्र समोर आले आहे. कर्जमाफीचा लाभ मिळेल या अपेक्षेने अनेकांनी मुद्दाम कर्ज थकविले; मात्र शासनाने कर्जमाफीसाठी पात्रतेचा कालावधी निश्चित केल्याने अशा शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे. उलट त्यांना आता कर्जाच्या मूळ रकमेसोबतच वाढीव व्याजाचाही भार सहन करावा लागणार आहे.**

बँकांकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, २०२४-२५ च्या तुलनेत २०२५-२६ या आर्थिक वर्षात थकबाकीदार शेतकऱ्यांची संख्या तब्बल चौपटीने वाढली आहे. तसेच थकीत कर्जाची रक्कम अडीच पटीने वाढल्याचेही दिसून येत आहे. राज्यातील राष्ट्रीयीकृत, खासगी आणि सहकारी बँकांमध्ये ही वाढ नोंदविण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात



सत्ताधारी भाजपाने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर विरोधी पक्षांनीही सातत्याने कर्जमाफीची मागणी लावून धरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विविध कार्यक्रमांत लवकरच कर्जमाफीचा निर्णय होईल, असे संकेत दिल्याने शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा निर्माण झाली होती. परिणामी, अनेक शेतकऱ्यांनी कर्जाची नियमित परतफेड करण्याऐवजी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत राहणे पसंत केले. बँकिंग क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मते, शेती कर्ज माफ होणार या विश्वासामुळे गेल्या वर्षभरात लाखो शेतकरी थकबाकीत गेले. काही भागांत तर नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनीही कर्जमाफीच्या आशेने हप्ते भरणे थांबविले. याचा परिणाम बँकांच्या वसुलीवर झाला असून, कर्ज वितरण व्यवस्थेवरही दबाव वाढला आहे. दरम्यान, शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### वृत्तपत्रामध्ये गरम खाद्यपदार्थ वाढणे पडणार महागात

नवी दिल्ली : भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने खाद्यपदार्थांच्या स्वच्छतेबाबत आणि सुरक्षिततेबाबत अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे मिठाई, भजी, वडापाव किंवा इतर कोणतेही गरम खाद्यपदार्थ वर्तमानपत्राच्या कागदावर वाढल्यास किंवा पार्सल दिल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे. प्राधिकरणाने या संदर्भात सर्व खाद्यपदार्थ विक्रेत्यांना ताकीद दिली आहे. वृत्तपत्रांच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये घातक रसायने आणि जड धातूंचे अंश असतात. जेव्हा गरम किंवा तेलकट पदार्थ थेट वर्तमानपत्राच्या कागदावर ठेवले जातात, तेव्हा हे रासायनिक घटक अन्नामध्ये मिसळतात. यामुळे आरोग्यावर दीर्घकालीन दुष्परिणाम होऊ शकतात. वृत्तपत्राच्या शाईमध्ये असलेल्या रसायनांमुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो.

### ४ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वर्षा' निवासस्थानी महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील आघाडीची जबिल तसेच दुबईस्थित आरएसए ग्लोबल यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे महाराष्ट्रात ४ हजार ८० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ४ हजार ७५० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी निर्माण होणार आहेत. या दोन्ही प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणूक, निर्यात क्षमता आणि आधुनिक लॉजिस्टिक्स व्यवस्थेला मोठी चालना मिळणार असून उच्च कौशल्याधारित रोजगार निर्मितीला वेग मिळेल. तसेच इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रस्थान आणखी मजबूत होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

### बस-दुचाकीचा भीषण अपघात; ३ जागीच ठार

परभणी: जिंतूरहून परभणीकडे जाणाऱ्या एस.टी. महामंडळाच्या बसने दुचाकीला उडवल्याची घटना शनिवार दि. ६ जून रोजी सायंकाळी ४.४५ वाजताच्या सुमारास कोक जवळील पिंपरी फाट्याजवळ घडली. या भीषण अपघातात दुचाकीवरील ३ जण जागीच ठार झाले. ठार झालेल्या व्यक्तींमध्ये आजी, आजोबा व नातवाचा समावेश आहे. या अपघातानंतर बस चालक फरार झाला. जिंतूर तालुक्यातील शेवडी येथील आजी, आजोबा नातवासह दुचाकी (क्रमांक एम.एच. ३८ के ६६८२) वरून कौडगाव येथून जिंतूरकडे जात होते. याचवेळी एस.टी. महामंडळाची जिंतूर आगाराची बस क्रमांक (एम.एच. १३ सीयू ७८३३) जिंतूरहून परभणीकडे जात होती. दुचाकी महामार्गावर येताच बसने जोराची धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील भगवान बळीराम काळे (५८), सुशीला भगवान काळे (५२), कन्हैया गजानन काळे (१२) सर्व राहणार शेवडी हे ३ जण जागीच ठार झाले.

# धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या !

## जंतर-मंतरवर कॉकरोज जनता पार्टीचा एल्गार, हजारो विद्यार्थ्यांची उपस्थिती



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

परीक्षा पेपरफुटी आणि इतर राष्ट्रीय परीक्षांमधील घोटाळा प्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शनिवारी (दि. ६) दिल्लीतील जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. ''शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या!'' अशा घोषणांनी जंतर-मंतरचा परिसर दणाणून गेला. या आंदोलनात देशभरातून आलेले हजारो आंदोलक सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी आणि तरुणांची संख्या मोठी होती. आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आणि या गैरप्रकाराच्या विरोधात न्याय मागण्यासाठी काही ज्येष्ठ नागरिकही आपल्या पाल्यांसह या आंदोलनात खांद्याला खांदा लावून उभे राहिलेले दिसले.

या आंदोलनाची हाक कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिली होती. अमेरिकेच्या बॉस्टनमधून शनिवारी सकाळी दिल्ली विमानतळावर दाखल झालेले 'सीजेपी ' संस्थापक अभिजित ▶▶ पान २ वर

### 'देशातील तरुण लढा देतील - अभिजीत दिपके

''देशातील तरुण आता घाबरणार नाहीत, ते लढा देतील. झुरळेही घाबरत नाहीत आणि ती कधी मरतही नाहीत,'' असे अभिजीत दिपके यांनी जंतर-मंतर येथील आंदोलकांना संबोधित करताना म्हटले. दीपके म्हणाले की, सरकारविरोधात आवाज उठविणाऱ्या तरुणांविषयी देशातील अनेक मातांना भीती वाटते. ''मी आंदोलनासाठी भारतात परतत असताना माझ्या आईलाही सरकारकडून कारवाई होईल, अशी चिंता होती. सरकारविरोधात बोलणाऱ्या प्रत्येक तरुणाच्या कुटुंबाला अशीच भीती वाटत असते,'' असा दावा त्यांनी केला.

### 'जय श्री राम'च्या घोषणांनी आंदोलनात गोंधळ

या आंदोलनात 'जय श्री राम'च्या घोषणा देत काही जणांनी आंदोलनस्थळाच्या दिशेने कूच करत जंतर-मंतर परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. या गटाने आंदोलनाला विरोध दर्शवत घोषणाबाजी केली. परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन घटनास्थळी तैनात असलेल्या दिल्ली पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला आणि संबंधितांना ताब्यात घेत परिसरातून बाहेर काढले. दिवसभर घोषणाबाजी, भाषणे आणि विविध मागण्यांवर चर्चा सुरू असताना पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवली. काही काळ निर्माण झालेला तणाव वगळता आंदोलन शांततेत सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### आता देशभर आंदोलन

आंदोलनादरम्यान दीपके यांनी शिक्षणमंत्र्यांना सायंकाळी ५ वाजेपर्यंत राजीनामा देण्याची मुदत दिली होती. मात्र, निर्धारित वेळेत राजीनामा न आल्याने आता देशभरात आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. येत्या आठवडाभरात विविध शहरांमध्ये निदर्शने आयोजित करण्यात येणार असून, पुढील शनिवारी जंतर-मंतर येथे पुन्हा मोठ्या आंदोलनाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### हातात गुलाबाचे फूल घेऊन सोनम वांगचुक दाखल

नीट पेपर लीक आणि देशातील नामांकित परीक्षांमधील घोटाळ्यांविरोधात दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर सुरू असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाला आता प्रचंड मोठे राष्ट्रीय स्वरूप आले आहे. लडाखचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे हातात लाल गुलाबाचे फूल घेऊन आंदोलनात अधिकृतपणे सहभागी झाले. त्यांच्या आगमनामुळे आंदोलक विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

## मान्सून तळकोकणात दाखल



पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात लवकरच सर्वंत्र आनंद सरी सुरु होणार आहेत कारण शनिवारी दुपारी सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सून दाखल झाला. दरवर्षी प्रमाणे तो वेळेवर कोकणात आला आहे. त्याचा वेग किंचित मंदावला आहे. रविवारी तो पुणे तर सोमवार पर्यंत मुंबईत दाखल होईल असा अंदाज आहे. तळकोकणात तो ५ ते ७ जूनच्या सुमारास येतो. यंदा तो वेळेवर दाखल झाला आहे.**

मान्सूनने शुक्रवारी गोवा राज्यात वेगाने प्रवेश केला होता, मात्र शनिवारी महाराष्ट्रातील तळकोकणात येताना त्याची गती किंचित कमी झाली. वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० वरुन ताशी ५० ते ६० इतका आहे. शनिवारी दुपारी ३ च्या सुमारास तो सिंधुदुर्ग जिल्ह्यात आला. रविवारी पुणे तर सोमवारी मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सून राज्यात आला तरी वाऱ्यांना पाहिजे तेव्हढी बळकटी नाही, त्यामुळे शनिवारी बहुतांश भागात कडक उन्हासह ढगाळ वातावरणामुळे उकाडा जाणवत होता. मान्सून तळकोकणात आला आहे. मात्र त्याचा जोर विदर्भात जास्त आहे, कारण हवेचे दाब त्या भागात कमी आहेत. गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम या पाच जिल्ह्यांना ८ जून रोजी अतिमुसळधारेचा ऑरेंज अलर्ट तर कोकण, मध्यमहाराष्ट्र अन मराठवाड्याला ७ ते ९ जून या कालवधीत मध्यम पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# ६ लाख ४० हजारांची लाच घेताना अंबडचा तहसीलदार चव्हाण बीड एसीबीच्या जाळ्यात!

जालना- बीड । प्रतिनिधी

**गोदावरी नदी पात्रातून बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर कारवाई न करण्यासाठी तब्बल ६ लाख ४० हजार रुपयांची लाच घेताना अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. बीड आणि जालना जिल्ह्याच्या हद्दीवर ही धडक कारवाई करण्यात आली असून, या कारवाईमुळे महसूल विभागात प्रचंड खळबळ उडाली आहे.**

बीड आणि जालना जिल्ह्याच्या हद्दीवरून वाहणाऱ्या गोदावरी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर बेसुमार आणि बेकायदेशीर वाळू उपसा केला जातो. हा बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी, तसेच पोकलेन मशीनवर कारवाई न करणे आणि ६ हायवा (डंपर) चालू देण्याच्या मोबदल्यात मंथली (मासिक हप्ता) म्हणून तहसीलदार विजय चव्हाण यांनी तब्बल ७ लाख रुपयांची मागणी केली होती. शेवटी तडजोडीअंती ६ लाख ४० हजार रुपये देण्याचे ठरले. तक्रारदाराच्या तक्रारीवरून बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक चितमपल्ली आणि त्यांच्या पथकाने अत्यंत गोपनीयतेने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना तहसीलदार विजय चव्हाण (रा. कासलेवार मार्बल सोसायटी, रो-हाऊस नं. ११९) यांना रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी जालना जिल्ह्यातील अंबड ▶▶ पान २ वर



# शासकीय नोकरीचे आमिष दाखवून तरुणाची चार लाखांची फसवणूक

## जिल्हाधिकाऱ्यांचे नाव पुढे करून महिलेने उकळली रक्कम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई येथे जिल्हाधिकारी कार्यालयात वैयक्तिक सहाय्यक (पीए) पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून, एका २४ वर्षीय सुशिक्षित बेरोजगार तरुणाची चार लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात काजल देविदास भट्ट नामक महिलेविरुद्ध फसवणुकिचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

आरोपी महिलेने स्वतःला महसूल विभागातील अधिकारी असल्याचे भासवून हा संपूर्ण डाव रचला होता. बनावट नियुक्ती आदेश हातात पडल्यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणाने पोलिसांत धाव घेतली आहे. विशेष म्हणेज अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी आणि बीडचे जिल्हाधिकारी यांना पैसे द्यावयाचे आहेत असे सांगून त्या महिलेने तरुणाकडून रक्कम उकळली. या घटनेतील फिर्यादी ओमकार संतोष शिंदे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०६ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६५.५० क्विंटल | २,१५० | २,४०० | २,२८० |
| ज्वारी/हायब्रिड: १११.०० क्विंटल | २,२९१ | ३,९६८ | २,८०६ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,८०० | ७,३६१ | ७,१५३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५३.०० क्विंटल | २,२०० | २,७४५ | २,३५५ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: १३.५० क्विंटल | ५,५८० | ७,३५८ | ६,८३९ |

# आंतरराष्ट्रीय विमानतळावर छ. शिवाजी महाराजाच्या भव्य पुतळ्याचे अनावरण

पनवेल । प्रतिनिधी

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल १ वर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण अत्यंत उत्साहात पार पडले.**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा विमानतळ परिसराचे प्रमुख आकर्षण सुमारे आठ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत पूर्ण झालेली ही वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील एक प्रमुख आकर्षण ठरणार आहे. भव्य पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालविकास मंत्री अदिती सुनील तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित होते. भूमिपुत्र स्वर्गीय दि. बा.



पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापक यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड द्वारे विकसित करण्यात आलेल्या या स्मारकामध्ये ८ फुटांच्या भव्य चबूतऱ्यावर १२ फुटांचा कांस्य धातूचा अर्धपुतळा ▶▶ पान २ वर


# लंडनमध्येही झुरळ वक्तव्याचा निषेध

## सरन्यायाधीशांच्या व्याख्यानात गोंधळ; भारताकडून निषेध

लंडन । वृत्तसंस्था

**भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या लंडनमधील बर्कबेक येथील व्याख्यानादरम्यान उपस्थितांनी त्यांच्या जुन्या वक्तव्यांवरून प्रश्न उपस्थित केल्याने गोंधळ उडाला. या प्रकारावर लंडनमधील भारतीय उच्चायुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरन्यायाधीशांच्या झुरळ संदर्भातील वादग्रस्त टिप्पणीची चर्चा यामुळे पुन्हा एकदा सुरू झाली आहे.**

युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या बर्कबेक येथे सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे ''कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा'' या विषयावर व्याख्यान झाले. यानंतर प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान उपस्थितांनी



त्यांच्या अलीकडील झुरळ टिप्पणीवर प्रश्न विचारल्याने वातावरण तापले. प्रश्नोत्तराच्या सत्रादरम्यान एका उपस्थिताने सूर्यकांत यांना भारतातील लोकशाहीची स्थिती आणि विरोधाप्रती वाढत्या शत्रुत्वाच्या भावनेवर प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओ क्लिपमध्ये दिसतेय की, संबंधित व्यक्तीने प्रश्न विचारला की, भारतातील आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक कायदेशीर अभ्यासकांकडून आम्हाला ऐकायला मिळत आहे की, भारतातील वाढत्या विरोधाच्या गळचेपीबद्दल मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. ही शत्रुत्वाची भावना काही अंशी सरन्यायाधीशांच्या भाषणातही प्रतिबिंबित होताना दिसत आहे, ज्याची खूप चर्चा झाली आहे. दुसऱ्या एका उपस्थिताने सरन्यायाधीशांना १५ मे रोजी न्यायालयात केलेल्या वक्तव्यावर प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला, ज्यावरून भारतात मोठा वाद निर्माण झाला होता. यावेळी संयोजकांनी हस्तक्षेप करत हे प्रश्न स्वीकारण्यास नकार दिला. मी पूर्ण आदराने सांगू इच्छितो की, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# वैश्विक संकटाची चाहूल चिंताजनक !

प्रशांत महासागरात आकार घेत असलेल्या एल निनोच्या प्रभावामुळे येत्या काही महिन्यांत जगभरातील हवामान व्यवस्थेत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी, अन्नधान्य तुटवडा आणि जलसंकट यांसारख्या गंभीर नैसर्गिक संकटांची तीव्रता वाढू शकते, असा इशारा जागतिक हवामान संघटनेने दिला आहे. हा इशारा केवळ हवामानशास्त्रीय अंदाज नसून संपूर्ण मानवजातीसाठी धोक्याची घंटा आहे. गेल्या काही वर्षांपासून जागतिक तापमानवाढीचे परिणाम जगभर अनुभवास येत असताना, एल निनो ही परिस्थिती आणखी गंभीर बनविण्याची चिन्हे आहेत.

हवामान हा पृथ्वीवरील जीवनाचा मूलभूत आधार आहे. शेती, जलस्रोत, अन्नसुरक्षा, जैवविविधता आणि मानवी आरोग्य या सर्व गोष्टी हवामानाशी थेट जोडलेल्या आहेत. हवामानातील असंतुलनाचा परिणाम केवळ निसर्गावरच नाही, तर सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थांवरही होतो. एल निनो ही अशीच एक नैसर्गिक हवामान घटना आहे, जी प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाचे तापमान असामान्यरीत्या वाढल्यामुळे निर्माण होते. या बदलामुळे जगभरातील पर्जन्यमान, तापमान आणि वाऱ्यांच्या पद्धतींमध्ये मोठे बदल घडून येतात.

यंदाचा एल निनो हा सामान्य नसून 'सुपर एल निनो' ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जागतिक हवामान संघटनेच्या अंदाजानुसार जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत एल निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता सुमारे ८० टक्के आहे, तर वर्षअखेरपर्यंत हा प्रभाव कायम राहण्याची शक्यता ९० टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे जगभरातील सरकारे, वैज्ञानिक संस्था आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.एल निनोचा प्रभाव केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही. दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि मध्य आशियातील काही भागांमध्ये अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होऊ शकते, तर ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, कॅरिबियन प्रदेश, मध्य अमेरिका आणि दक्षिण आशियातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती उद्भवू शकते. याचा अर्थ असा की पृथ्वीवरील जवळजवळ प्रत्येक खंडाला काही ना काही स्वरूपात नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागू शकतो. हवामानातील ही टोकाची स्थिती मानवी जीवन, शेती, उद्योग आणि अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणारी ठरणार आहे.

भारताच्या दृष्टीने ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. देशातील बहुतांश शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. मान्सूनमध्ये थोडाही खंड पडल्यास त्याचे थेट परिणाम शेती उत्पादनावर होतात. एल निनोच्या प्रभावामुळे यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पावसाचे प्रमाण ९० टक्क्यांच्या आसपास मर्यादित राहिल्यास अनेक राज्यांमध्ये दुष्काळाचे संकट निर्माण होऊ शकते. जलाशयांतील पाणीसाठा, भूजलपातळी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि वीज निर्मिती यावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसण्याची भीती आहे. एल निनोचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे तापमानवाढ. २०२३-२४ मधील एल निनो हा आतापर्यंतच्या सर्वात तीव्र घटनांपैकी एक मानला गेला आणि त्याच्या प्रभावामुळे २०२४ हे वर्ष जागतिक स्तरावर विक्रमी उष्णतेचे ठरले. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण झाल्यास २०२७ किंवा २०२८ ही वर्षे इतिहासातील सर्वाधिक तापदायक वर्षे ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी, हिमनद्यांचे वितळणे आणि समुद्रपातळी वाढणे या समस्यांची तीव्रता आणखी वाढू शकते.

ग्लोबल वॉर्मिंग आणि एल निनो यांचा एकत्रित परिणाम भविष्यातील पिढ्यांसाठी गंभीर संकट निर्माण करू शकतो. संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार २०३० पर्यंत पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळील सरासरी तापमान हे औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढण्याची शक्यता आहे. हा टप्पा ओलांडला गेल्यास हवामान बदलाचे अनेक परिणाम अपरिवर्तनीय स्वरूप धारण करू शकतात. अन्नधान्य उत्पादन घटणे, पाण्याची टंचाई, आरोग्यविषयक संकटे, पर्यावरणीय स्थलांतर आणि जागतिक आर्थिक अस्थिरता यांसारख्या समस्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर केवळ चिंता व्यक्त करून चालणार नाही. जागतिक स्तरावर ठोस आणि तातडीच्या कृतीची आवश्यकता आहे. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढविणे, जंगलसंवर्धन, जलव्यवस्थापन आणि हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या विकास धोरणांना प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे. पॅरिस हवामान करारातील उद्दिष्टे प्रभावीपणे राबविण्यासाठी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. हवामान बदल हा कोणत्याही एका देशाचा प्रश्न नसून संपूर्ण मानवजातीसमोरील सामूहिक आव्हान आहे. आज जग एका नव्या दुष्टचक्राच्या उंबरठ्यावर उभे आहे. हवामानातील वाढते असंतुलन आणि एल निनोसारख्या घटनांचे वाढते परिणाम मानवाच्या विकास मॉडेलवरच प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत. जागतिक हवामान संघटनेच्या इशाऱ्याकडे गांभीर्याने पाहून सरकारे, उद्योग, वैज्ञानिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यातील पिढ्यांना अधिक असुरक्षित आणि संकटग्रस्त पृथ्वीचा वारसा मिळेल. म्हणूनच आजची वेळ ही केवळ सावधगिरीची नाही, तर निर्णायक कृतीची आहे. 'सावध ऐका, पुढल्या हाका' हा दृष्टिकोन स्वीकारूनच मानवजातीला या वैश्विक संकटाचा सामना करावा लागणार आहे.

# वक्फ प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी दोन निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती; हज हाऊसमधूनही चालणार कामकाज

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कामकाज अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. वक्फशी संबंधित प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी दोन निवृत्त दिवाणी न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली १२ कायदेशीर सहाय्यकांचे विशेष पथक कार्यरत राहणार आहे. तसेच जागेच्या कमतरतेमुळे पाणचक्की येथील वक्फ मंडळाच्या कार्यालयातील काही विभागांचे कामकाज आता हज हाऊसमधून चालविण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



हज हाऊस येथे नुकतीच वक्फ मंडळाची दोन दिवसीय बैठक पार पडली. बैठकीच्या पहिल्याच दिवशी वक्फशी संबंधित २१ प्रकरणांची सुनावणी करण्यात आली. यापैकी ११ वादग्रस्त प्रकरणे दोन्ही पक्षांच्या संमतीने तडजोडीतून निकाली काढण्यात आली. वक्फ बोर्डाच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर सामंजस्यातून वाद मिटविण्यात आल्याचा दावा मंडळाने केला आहे. बैठकीत वक्फ मालमत्तांच्या विकास, विविध योजनांची अंमलबजावणी आणि नियमित बदल अहवालांबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. वक्फशी संबंधित प्रकरणांमध्ये विविध न्यायालये आणि प्राधिकरणांमध्ये प्रभावीपणे बाजू मांडण्यासाठी विधी विभाग बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नियुक्त करण्यात येणाऱ्या दोन निवृत्त न्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील पथक कनिष्ठ न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय तसेच वक्फ प्राधिकरणातील प्रकरणांवर लक्ष केंद्रित करणार आहे. समीर काझी यांनी सांगितले की, राज्यातील अनेक मशिदी आणि दर्गे नोंदणी व आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे धोक्यात आले आहेत. मालकी हक्काची कागदपत्रे, वक्फ नोंदणी आणि इतर जमीन अभिलेख वेळेवर उपलब्ध नसल्याने अनेक धार्मिक स्थळांवर अतिक्रमण किंवा पाडकामाची कारवाई होण्याची शक्यता निर्माण होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी महाराष्ट्र वक्फ बोर्डाने विशेष कृती दल (टास्क फोर्स) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या टास्क फोर्समध्ये चार्टर्ड अकाउंटंट आणि विधी विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असेल. हे पथक राज्यातील मशिदी व दर्ग्यांना भेट देऊन आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल तसेच संबंधित समित्यांना नोंदणी आणि अभिलेख तयार करण्यासाठी मदत करेल. काझी यांनी सांगितले की, सध्या राज्यातील सुमारे १,६०० वक्फ संस्थांची नोंदणी प्रलंबित आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे नोंदणी प्रक्रिया रखडली आहे. वक्फ प्राधिकरणाच्या निर्देशानुसार अलीकडेच चार वक्फ संस्थांची नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. वक्फ कामकाजाला गती देण्यासाठी अधिकाऱ्यांना २१ दिवसांच्या आत प्रकरणांचा निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यानंतर त्यांच्या कामाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच वक्फ कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र तपास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. या दोन दिवसीय बैठकीला बोर्ड सदस्य ए. यू. पठाण, हसनेन शाकिर, मौलाना अथर इफ्तेखार हाश्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी फय्याज खान, विशेष अधीक्षक खुसरो खान यांच्यासह वक्फ मंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तुकाराम मुंढे रुजू होताच अन्न व औषध विभागाचे झोपेत असलेला कर्मचाऱ्याला आली जाग

## भेसळयुक्त तेल, गुटखा व लेबलदोषयुक्त पेयांचा लाखोंचा साठा जप्त

जालना । प्रतिनिधी

**आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदाचा पदभार घेताच जालनाअन्न व औषध प्रशासन विभाग झोपी गेलेला आता खडबडून जाग आली. आणि दि. ५ जून रोजी जिल्ह्यात अन्नसुरक्षा व ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष मोहीम राबवत विविध ठिकाणी धडक कारवाई केली. या कारवाईत भेसळयुक्त खाद्यतेल, प्रतिबंधित गुटखा तसेच लेबलदोषयुक्त ऊर्जा पेयांचा एकूण सुमारे ३ लाख ९५ हजार ५९९ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.**



प्रथम कारवाईत अंबड येथील भगवती ट्रेडर्स या आस्थापनावर तपासणी करण्यात आली. यावेळी भेसळयुक्त असल्याचा संशय असलेल्या खाद्यतेलाचा साठा आढळून आला. संबंधित तेलाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून ३५८ किलो वजनाचा व ५७ हजार २८० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत अंबड तालुक्यातील शहागड येथील रहिम रहमान शेख याच्या ताब्यातून प्रतिबंधित अन्नपदार्थ गुटख्याचा मोठा साठा आढळून आला. या प्रकरणात गुटखा व वाहने असा एकूण २ लाख १९ हजार ७१९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. तिसऱ्या कारवाईत जालना येथील समर्थ एजन्सी येथे तपासणी दरम्यान इलेक्ट्रोलाइट एनर्जी ड्रिंक या उत्पादनाच्या लेबलमध्ये अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळून आले. त्यामुळे १ लाख १८ हजार ६०० रुपये किमतीचा लेबलदोषयुक्त साठा जप्त करण्यात आला असून संबंधित प्रकरणात नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या अन्नपदार्थांच्या विक्री व वितरणाविरुद्ध कारवाईचा धडाका सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच नागरिकांनी भेसळयुक्त किंवा संशयास्पद अन्नपदार्थ, प्रतिबंधित गुटखा अथवा नियमबाह्य उत्पादनांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न) नि. सु. कुलकर्णी यांनी केले आहे.

# मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवा-डॉ.कराड

## संपूर्ण योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे-भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

**केंद्रातील मोदी सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त ''विश्वास, विकास व जनकल्याण'' या अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने जिल्हा नियोजन बैठकीचे आयोजन भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे करण्यात आले. या बैठकीत आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध जनसंपर्क कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस प्रदेश संयोजक डॉ. भागवत कराड, मराठवाडा विभाग संयोजक नितीन काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.**

यावेळी डॉ.भागवत कराड यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांतील विविध विकासकामांचा आढावा घेतला. पायाभूत सुविधा, गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, शेतकरी हित, सामाजिक न्याय तसेच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक प्रभावीपणे काम करावे असे हि त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त जालना महानगर जिल्ह्यात विविध



जनसंपर्क कार्यक्रम, सामाजिक उपक्रम तसेच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या विकासकामांची व जनकल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी होतील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, सोपान पेंढारकर, अक्षय गोरंटयाल, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, रमेश गौरक्षक, नगरसेविका संध्या देठे, सखुबाई पणबिसरे, रिमा खरात, संतोष माधवले, सुमित सुरडकर, उमेश पेंढारकर आदींची उपस्थिती होती. बैठकीनंतर ''एक झाड आईच्या नावाने'' या अभियानांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्षारोपणात सहभाग नोंदविला.

# उन्हाचा पारा वाढला, हृदयाचा धोकाही वाढला

## उकाड्यामुळे हृदयविकाराच्या झटक्यांत वाढ-डॉ. रोहन मालुरे

बीड । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक भागांत तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जात असताना उष्णतेमुळे हृदयावर होणारा ताण वाढत असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले आहे. कडक उन्हाळ्यात अचानक हृदयविकाराचा झटका येणे, हृदयाचे ठोके अनियंत्रित होणे आणि उष्माघाताच्या घटना वाढताना दिसत आहेत, अशी माहिती डॉ. रोहन मालुरे यांनी दिली.**



डॉ. मालुरे यांनी सांगितले की, मानवी शरीराचे सामान्य तापमान सुमारे ३७ अंश सेल्सिअस असते. बाहेरील तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त झाल्यानंतर शरीराचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी मेंदू त्वचेकडे अधिक रक्तप्रवाह पाठवतो. घामाच्या स्वरूपात उष्णता बाहेर टाकण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक असते. मात्र त्यामुळे हृदयाला नेहमीपेक्षा दोन ते तीन पट अधिक वेगाने रक्त पंप करावे लागते. परिणामी हृदयाचे ठोके वाढतात आणि हृदयावर अतिरिक्त ताण निर्माण होतो. उन्हामुळे सतत घाम येत असल्याने शरीरातील पाणी आणि क्षारांची मोठ्या प्रमाणात कमतरता निर्माण होते. या स्थितीला डिहायड्रेशन म्हणतात. डिहायड्रेशनमुळे रक्ताचे प्रमाण कमी होते आणि रक्त अधिक घट्ट होऊ लागते. त्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये गाठी तयार होण्याचा धोका वाढतो. अशा गाठी हृदयाकडे जाणाऱ्या रक्तप्रवाहात अडथळा निर्माण करून हृदयविकाराचा झटका येण्यास कारणीभूत ठरू शकतात. उष्माघात झाल्यास शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढते. अशावेळी शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली निकामी होऊ शकते. हृदयाचे ठोके अतिवेगाने वाढल्याने शरीरातील महत्त्वाच्या अवयवांपर्यंत पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन पोहोचत नाही. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, अवयव निकामी होणे किंवा जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. हायड्रेशन कायम ठेवा : उन्हात बाहेर जाण्यापूर्वी आणि परत आल्यानंतर पुरेसे पाणी प्या. साध्या पाण्यासोबत लिंबूपाणी, ताक किंवा ओआरएस द्रावणाचे सेवन करा. त्यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखण्यास मदत होते. कडक उन्हाच्या वेळेत बाहेर जाणे टाळा : दुपारच्या वेळी तापमान सर्वाधिक असते. या काळात बाहेर जाणे शक्यतो टाळावे. विशेषतः उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा हृदयविकार असलेल्या व्यक्तींनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे., हलका व सैलसर पोशाख वापरा : कापडी, हलक्या रंगाचे आणि सैल कपडे परिधान केल्यास शरीरातील उष्णता कमी राहण्यास मदत होते., उष्माघाताची लक्षणे ओळखा : चक्कर येणे, अत्याधिक घाम येणे, अशक्तपणा, श्वास घेण्यास त्रास होणे, हृदयाचे ठोके वाढणे किंवा बेशुद्धावस्था ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशी लक्षणे दिसल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. ''उन्हाळ्यात विशेषतः ज्येष्ठ नागरिक, हृदयविकार, रक्तदाब व मधुमेह असलेल्या रुग्णांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. योग्य प्रमाणात पाणी पिणे आणि कडक उन्हापासून बचाव करणे हेच हृदयाचे संरक्षण करण्याचे सर्वात प्रभावी उपाय आहेत,'' असे आवाहन डॉ. रोहन मालुरे (एम.बी.बी.एस., एम.डी. मेडिसिन) यांनी केले.

# पान १ वरून...

पान १ वरून...

### कर्जमाफीच्या आशेने कर्ज थकविणाऱ्या

योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत पीक कर्ज घेतलेले आणि ३० सप्टेंबरपर्यंत थकीत असलेले तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जखाती पात्र ठरविली आहेत. मात्र मार्च २०२५ नंतर मोठ्या प्रमाणावर घेतलेली पीक कर्जे थकीत गेल्याने अशा अनेक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्याची शक्यता कमी झाली आहे. यामुळे कर्जमाफीच्या अपेक्षेने जाणूनबुजून थकबाकीत गेलेल्या शेतकऱ्यांना आता दुहेरी फटका बसणार आहे. एकीकडे कर्जमाफीपासून वंचित राहावे लागणार असून, दुसरीकडे मूळ कर्जासह व्याजाची रक्कमही भरावी लागणार आहे. अनेक प्रकरणांमध्ये वाढीव व्याजामुळे कर्जाचा बोजा अधिक वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, राज्यात पीक कर्जाचे वितरण आणि लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या वाढली असताना मुदत कर्ज, उद्योग-धंदे कर्ज तसेच इतर प्राधान्य क्षेत्रातील कर्जवाटपात घट झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीकर्जाचे वाढते महत्त्व आणि त्याचवेळी कर्जमाफीच्या अपेक्षेमुळे निर्माण होणारे आर्थिक दुष्परिणाम पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. तज्ज्ञांच्या मते, वारंवार होणाऱ्या कर्जमाफीच्या घोषणांमुळे कर्जसंस्कृतीवर विपरीत परिणाम होतो. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण होते, तर कर्ज न फेडणाऱ्यांना प्रोत्साहन मिळाल्याचा संदेश जातो. त्यामुळे भविष्यात कर्जमाफीऐवजी उत्पन्नवाढ, हमीभाव, सिंचन आणि कृषी पायाभूत सुविधांवर भर देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

------------

### धर्मेंद्र प्रधान राजीनामा

दीपके हे विमानतळावरील दीड तासांच्या हायव्होल्टेज ड्राम्यानंतर कडक सुरक्षा व्यवस्थेत थेट जंतर-मंतर मैदानावर पोहोचले. दीपके मैदानावर पोहोचताच हजारो विद्यार्थ्यांनी 'जय भीम' आणि 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या पेपर लीक घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ पद सोडले पाहिजे, या मागणीवर सर्व आंदोलक ठाम होते. आंदोलनात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी समर्थकांना हे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध ठेवण्याचे आवाहन केले. तसेच आदराचे प्रतीक म्हणून पोलीस कर्मचाऱ्यांना फुले देण्याचेही सुचवले.

------------

### शासकीय नोकरीचे आमिष दाखवून

(वय २४, रा. अमृतेश्वरनगर, अंबाजोगाई) हा तरुण सुशिक्षित असून स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. संशयित महिला आरोपी काजल देविदास भट्ट (रा. मारवाडगल्ली, नानज, ता. जामखेड) ही फिर्यादीच्या मामीच्या घरी भाड्याने राहत होती. तिने स्वतःला अंबाजोगाई येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असल्याचे सांगितले होते. काही दिवसांपूर्वी काजलने फिर्यादीच्या मामीला गाठून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात वैयक्तिक सहाय्यक पदाच्या तीन जागा रिक्त असल्याचे सांगितले. आपले वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आणि जिल्हाधिकाऱ्यांशी चांगले संबंध असल्याचे सांगून तिने ओमकारला नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. या पदासाठी ४५ हजार रुपये पगार आणि प्रवास भत्ता मिळेल असे सांगून तिने कुटुंबाला जाळ्यात ओढले. यासाठी तिने ५ लाख रुपयांची मागणी केली, जी तडजोडीअंती ३ लाख रुपयांवर निश्चित झाली. आरोपी महिलेने वेगवेगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि शासकीय कामासाठी पैसे द्यावे लागतील असे सांगून, फिर्यादी व त्यांच्या मामीकडून रोख आणि ऑनलाईन स्वरूपात एकूण ४ लाख रुपये उकळले. त्यानंतर ३ जून रोजी तिने व्हॉट्सॲपवर एक नियुक्ती आदेश पाठवला. या आदेशावर कोणताही अधिकृत शिक्का किंवा लोगो नव्हता, तसेच जॉईनिंगची तारीख रविवारची असल्याने फिर्यादीला संशय आला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीच्या कुटुंबीयांनी काजलला जाब विचारला. सुरुवातीला तिने उडवाउडवीची उत्तरे दिली, परंतु पोलिसात जाण्याची भीती दाखवल्यानंतर तिने घाबरून १ लाख रुपये ऑनलाईन परत केले. उर्वरित रकमेबाबत विचारणा केली असता तिने उद्धटपणे वर्तन केले आणि त्यानंतर ती अचानक घरातून पळून गेली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी काजल देविदास भट्ट हिच्याविरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४) आणि ३१९(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस उपनिरीक्षक राजकुमार ससाणे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

---------

### ६ लाख ४० हजारांची लाच घेताना अंबडचा

पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, बीड एसीबीच्या या धडक कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई बीड एसीबी चे पोलीस उपाधीक्षक चितमपल्ली, पोलीस कॉन्स्टेबल बिडकर, खरसाडे, पुरी, सुरवसे यांनी केली.

---------

### लंडनमध्येही झुरळ

मी हा प्रश्न घेऊ शकणार नाही, कारण आजच्या कार्यक्रमाचा विषय कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा हा आहे, असे संयोजकांनी स्पष्ट केले. कार्यक्रमस्थळावरील त्या व्हिडिओमध्ये तिथले वातावरण तणावपूर्ण असल्याचे दिसत आहे. चर्चा सुरू असताना काही उपस्थितांनी जागेवर उभे राहून घोषणाबाजी किंवा हातवारे करण्यास सुरुवात केली. एका क्लिपमध्ये आयोजक प्रेक्षकांना शांत राहण्याचे आणि सुव्यवस्था राखण्याचे आवाहन करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर शेअर केला जात असून, उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे आणि तिथल्या वादाची चर्चा रंगली आहे. दरम्यान, ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्तांनी या गोंधळावर टीका केली असून, संबंधित व्यक्तींचे वर्तन अयोग्य असल्याचे म्हटले आहे.

------------

### आंतरराष्ट्रीय विमानतळावर छ. शिवाजी

बसवण्यात आला आहे. नवी मुंबईतील आकार आर्ट अँड स्कल्पचरचे शिल्पकार नितीन रोहिदास गोर्डे यांनी हा पुतळा साकारला असून, महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाने मान्यता दिलेल्या प्रारूपावर आधारित कॉपर अलॉय ब्रॉन्झ (तांबे मिश्रित कांस्य) मध्ये याची निर्मिती करण्यात आली आहे.

-------------

# कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

बीड । प्रतिनिधी



राज्यातील कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या बी.एस्सी.( ऑनर्स ) कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ साठी ही प्रक्रिया राबवली जात असून, पात्र विद्यार्थ्यांना १२ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी कृषी विद्यापीठांतर्गत इंग्रजी माध्यमातून तीन वर्षाचा कृषी तंत्रनिकेतन पदविका( डिप्लोमा) अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पात्र ठरतील. गुणांच्या पात्रतेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ६० सीजीपीए, तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना किमान ५० सीजीपीए गुण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली या विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांना या कोट्यातून प्रवेश मिळणार आहे. प्रवेशाची माहिती पुस्तिका, पात्रता, निकष, उपलब्ध जागांचा तपशील आणि आरक्षणाचे नियम सीईटी कक्षाच्या ( https://cetcell.mahacet.org )या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.तरी इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी १२ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत असे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ०७ जून २०२६




## भाजयुमोतर्फे शिरपुऱ्यात 'आंबा-नारळ' वृक्षारोपण उपक्रम संपन्न!

केज । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा बीड जिल्ह्याच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात मंडळ निहाय किमान ५०० वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. लोकनेत्या पर्यावरण मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे, आमदार नमिताताई मुंदडा यांच्या आवाहनानुसार आणि भाजयुमो जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवला जात आहे.

याच संकल्पाचा भाग म्हणून, येवता जिल्हा परिषद गटातील शिरपुरा (ता. केज) येथील पवित्र दौलत बाबा मठ परिसर आणि गावात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजयुमोचे सुरज भैया घुले यांच्या विशेष पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरण रक्षणाचा संदेश आणि संगोपनाचा निश्चय

या मोहिमेअंतर्गत मठ परिसर व गावात निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आंब्याची व नारळाची रोपटी लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. केवळ झाडे न लावता, त्यांचे पुढील काळात जबाबदारीने संगोपन करण्याचा निश्चयही यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी केला.या स्तुत्य उपक्रमाप्रसंगी शिरपुरा गावातील आदरणीय सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, युवा मोर्चाचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. येणाऱ्या पिढीला हिरवेगार भविष्य देण्यासाठी भाजयुमो सदैव कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी संयोजकांनी व्यक्त केला.

## ज्येष्ठ अभ्यासक भूषण देशमुख यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

अ.नगर शहरावर जीवापाड प्रेम करणारे,निजामी इतिहासाचे गाढे अभ्यासक आणि स्नेहालयाच्या 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'चे संचालक भूषण गोपाळ देशमुख यांचे आज दि.६ मे २०२६ रोजी निधन झाले.त्यांच्या निधनाने अ.नगरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वर्तुळावर शोककळा पसरली आहे.आष्टी शहराचा चालताबोलता ऐतिहासिक 'कोष' हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.इतिहासाचे पाईक आणि 'हेरिटेज वॉक'चे प्रणेते स्व.भूषण देशमुख यांची ओळख केवळ एक इतिहासप्रेमी एवढीच मर्यादित नव्हती,तर ते नगरच्या समृद्ध वारशाचे खरे रक्षक आणि अभ्यासक होते.विशेषतः 'निजाशाही' आणि नगरच्या ऐतिहासिक जडणघडणीवर त्यांचा प्रचंड गाढा अभ्यास होता. अ.नगरच्या वैभवशाली इतिहासाची आणि येथील दुर्लक्षित ऐतिहासिक वास्तूंची नागरिकांना तसेच तरुण पिढीला नव्याने ओळख करून देण्यासाठी त्यांनी 'हेरिटेज वॉक' हा अभिनव उपक्रम सुरू केला होता.गेली अनेक वर्षे ते ऊन, पावसाची पर्वा न करता अत्यंत निष्ठेने हा उपक्रम चालवत होते. त्यांच्या रसाळ आणि अभ्यासपूर्ण मांडणीमुळे शेकडो नगरकरांना आपल्या शहराच्या इतिहासाचे वेगळे पैलू उलगडले होते.



सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान

इतिहासाच्या संवर्धनासोबतच देशमुख यांचे सामाजिक योगदानही मोठे होते.स्नेहालयाच्या 'रेडिओ नगर ९०.४ एफएम ' चे संचालक म्हणून त्यांनी अनेक वर्षे यशस्वीपणे धुरा सांभाळली. या कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक विषयांना वाचा फोडली आणि तळागाळातील लोकांचे आवाज मुख्य प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांच्या जाण्याने नगरच्या पत्रकारिता, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

अंत्यदर्शन आणि अंत्यविधी

नगरकरांना आपल्या लाडक्या इतिहास अभ्यासकाला अखेरचा निरोप देता यावा, यासाठी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. बालिकाश्रम रस्ता, अ.नगर येथे अंत्यविधी झाला.

# उर्दू माध्यमातील रिक्त पदे भरली जाणार

## निवृत्त शिक्षकांच्या लाभवाटपात सेवाज्येष्ठतेला प्राधान्य -मुकाअ जितीन रहेमान

पात्रुड । प्रतिनिधी

अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची भेट घेऊन जिल्हा परिषद शाळांमधील उर्दू माध्यमाच्या रिक्त पदांसंदर्भात चर्चा केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उर्दू माध्यमातील रिक्त पदांची माहिती पवित्र पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असल्याचे सांगितले.

संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील १२ उर्दू माध्यमिक शाळांमधील रिक्त माध्यमिक शिक्षक पदांची माहितीही पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या शाळांमध्ये शिक्षकांचे अनेक पदे रिक्त असून ती तातडीने भरण्याची आवश्यकता असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले.




तसेच, सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व शिक्षकांची जिल्हास्तरीय यादी तयार करून सेवाज्येष्ठतेनुसार उपदान (ग्रॅच्युइटी) व अंशराशीकरणाच्या रकमेचे वाटप करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सध्या सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्तीवेतनाशी संबंधित लाभ मिळण्यात मोठा विलंब होत आहे. अनेकदा आधी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना लाभ उशिरा मिळतात, तर नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना ते आधी मिळतात. त्यामुळे ज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी सकारात्मक भूमिका घेत यापुढे लाभांचे वितरण सेवाज्येष्ठतेनुसार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील शेकडो सेवानिवृत्त शिक्षकांना त्यांच्या हक्काचे आर्थिक लाभ वेळेत व सन्मानाने मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच उर्दू माध्यमातील रिक्त पदांची माहिती पवित्र पोर्टलवर उपलब्ध झाल्यानंतर भरती प्रक्रियेला गती मिळेल. परिणामी उर्दू शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल आणि पात्र उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. संघटनेच्या या पाठपुराव्यामुळे शिक्षक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे. यावेळी काजी अब्दुल माजेद, एम. झेड. खतीब, काझी मुशाहेद, उस्मान खान, मोमीन अब्दुल करीम, मोमीन अलीमोद्दीन, मोमीन जावेदमिया, शेख इमरान, मोमीन खैसर तसेच अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## केवळ कौतुकात न अडकता विद्यार्थ्यांनी पुढील करिअरवर लक्ष केंद्रित करावे - समाधान किरवले

बीड । प्रतिनिधी

दहावी-बारावीच्या परीक्षेत मिळालेले यश आणि त्यानंतर होणारे कौतुक हा प्रवासाचा शेवट नसून खऱ्या संघर्षाची ती केवळ सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सत्कार आणि कौतुकापुरते मर्यादित न राहता पुढील करिअरवर लक्ष केंद्रित करावे. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून कोणत्याही क्षेत्रात गेल्यास सर्वोच्च 'टॉप'ला पोहोचण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी करावा, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास अधिकारी समाधान किरवले यांनी केले.

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ०५ जून रोजी 'तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय सभागृह, बीड' येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा. प्रा. प्रदीप रोडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा. गणेश वाघ (मुख्याध्यापक, यशवंत विद्यालय, बीड) आणि मा. प्रा. डॉ. दत्ता नलावडे (मा. अध्यक्ष, बालकल्याण समिती




न्यायपीठ, बीड), प्रा.डी.जी.निकाळजे, डॉ.अश्विनी बेद्रे, डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी राऊत उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. दत्ता नलवडे यांनी स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार आपणच आहोत, असे सांगत विद्यार्थ्यांना सर्वोच्च यश मिळवण्याबरोबरच समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. तसेच गणेश वाघ यांनी तुलसी शैक्षणिक समूह विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व विविध संधी उपलब्ध करून देत असून, या संधी प्रा. प्रदीप रोडे सर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. प्रदीप रोडे यांनी आजच्या युगात करिअरच्या अनेक नवनवीन संधी उपलब्ध आहेत. मात्र, या संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. आपण नेमके का शिकतोय, याची कारणे आधी शोधली पाहिजेत. आजच्या काळात नुसती पदवी पुरेशी नाही, तर तुमच्याकडे कौशल्य असायला हवे. कौशल्य असेल तरच तुम्ही यशस्वी व्हाल. त्यासाठी प्रयत्न, संघर्ष आणि अपार मेहनत करण्याची तयारी ठेवून विद्यार्थ्यांनी काळाच्या नेहमी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे, असे नमूद केले. यानंतर दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी वृक्षारोपण




माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन दि ०५ जून शुक्रवार रोजी कारखान्याचे ज्येष्ठ संचालक तथा साखर संघ मुंबईचे उपाध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, चेअरमन वीरेंद्र सोळंके,व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार कारखाना स्थळी विविध वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला.

जागतिक पर्यावरण दिन व केंद्र शासनाच्या एक पेड माँ के नाम, या मोहिमेअंतर्गत कारखान्याचे संचालक आबासाहेब गायकवाड, कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांच्या हस्ते पन्नास वृक्षांचे रोपण करण्यात आले . माहे ऑक्टोबर २०२६ मध्ये ५०० वृक्ष लावण्याचा कारखान्याचा संकल्प असून, कारखान्याचे वतीने आतापर्यंत १२२०९ विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली असून ती चांगल्या पद्धतीने जोपासले आहेत. कारखाना प्रतिवर्ष वृक्षारोपण करून सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कारखाना व्यवस्थापन प्रयत्नशील आहे. यावेळी जनरल मॅनेजर इंजि एस एस शिंनगारे,सचिव सुरेश लगड, बी.एस.झोडगे, चिफ अकाउंटंट एस.बी.घाडगे, डीस्टलरी मॅनेजर एम.जे.निर्मळ,ऊस पुरवठा अधिकारी बी.एस.वगरे,ऊस विकास अधिकारी ए.टी.स्वामी यांच्यासह कर्मचारी कामगार उपस्थित होते.या कार्यक्रमाचे औचित्य साधून ऊपस्थित खाते प्रमुख आणि विभाग प्रमुख यांच्या हस्ते विविध जातींच्या वृक्षांची लागवड कारखाना कार्यस्थळावर करण्यात आलेली आहे.

## हृदयविकारांपासून बचावासाठी आयएमएचा विशेष उपक्रम, सर्व नागरिकांनी लाभ घेवा-डॉ.अमोल गिते

बीड । प्रतिनिधी

सध्याच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा यांसारख्या आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून समाजामध्ये आरोग्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर इंडियन मेडिकल असोसिएशन बीड व डब्लू डी डब्ल्यू यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनशैली आणि हृदय आरोग्य या विषयावर विशेष सामाजिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम दिनांक ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ६ वाजता ग्रैंड यशोदा बार्शी रोड, बीड येथे संपन्न होणार आहे.



या कार्यक्रमात मराठवाडातील प्रख्यात हृदयरोग तज्ज्ञ डॉ विलास मगरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. बदलती जीवनशैली, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, ताणतणाव, धूम्रपान, मद्यपान यांसारख्या कारणांमुळे वाढणाऱ्या हृदयविकारांबाबत ते सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच हृदयविकाराची सुरुवातीची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व आणि निरोगी जीवनासाठी आवश्यक सवयी याविषयीही नागरिकांना माहिती दिली जाणार आहे.सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ अनंत मुळे डॉ सौ बारकुल डॉ उषा ढगे यांनी तर डॉ पूजा माने व डॉ जयश्री घुगे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.याबाबत माहिती देताना डॉ अमोल गिते यांनी सांगितले की, आजच्या युगात तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत हृदयविकाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे. अनियमित दिनचर्या, फास्ट फूड संस्कृती, व्यायामाचा अभाव आणि वाढता मानसिक ताण ही यामागील प्रमुख कारणे आहेत. समाजामध्ये योग्य वेळी आरोग्य जागरूकता निर्माण झाली तर अनेक गंभीर आजार टाळता येऊ शकतात. खच-बीड सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या कार्यक्रमामध्ये नागरिकांना थेट तज्ज्ञ डॉक्टरांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असून हृदय आरोग्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळेल.पुढे बोलताना त्यांनी सर्व नागरिक, डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच युवक-युवतींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून निरोगी जीवनाचा संदेश समाजामध्ये पोहोचवावा, असे आवाहन केले.

# मृदा,जल आणि वृक्ष संवर्धन केले तरच भविष्य उज्ज्वल-जलनायक मयंक गांधी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामास जलनायक मयंक गांधी, टाटा ट्रस्टचे रवींद्रजीत सिंह व राकेश सिंह, आनंद बारिया, रिमी ओबेरॉय, देवदत्त सिंह, देव रंजन यांनी मंगळवारी भेट दिली.ग्लोबल विकास ट्रस्ट आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत सरस्वती नदीच्या सुमारे ५ किमी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येत असून ३५ रिचार्ज शाफ्ट उभारले जाणार आहेत. यामुळे जलसाठा वाढून भूजल पुनर्भरणास मोठी चालना मिळणार आहे.

दरम्यान नागरिक संवाद मेळाव्यात जलनायक मयंक गांधी यांनी जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीचे महत्त्व विशद केले. पाणी उपलब्ध झाले तर शेतीसह ग्रामीण विकासाला नवी दिशा



मिळते. त्यामुळे जलसंधारणासोबत पाण्याचा नियोजनबद्ध वापरही आवश्यक आहे, असे ते म्हणाले. त्यांनी शेतकऱ्यांना फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी २३ ते २९ जुलै २०२६ दरम्यान गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या २५ लाख वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाची माहिती देण्यात आली. पर्यावरण संतुलनासाठी जलसंधारण आणि वृक्षसंवर्धन एकमेकांना पूरक असल्याचा संदेश देत ग्रामस्थांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रामस्थांनी लोकसहभागातून जमा केलेली लोकवर्गणी यावेळी मयंक गांधी यांच्याकडे सुपूर्द केली. कार्यक्रमास शेतकरी, महिला, ग्रामस्थ आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी रवींद्रजीत सिंह (टाटा ट्रस्ट) यांनी सांगितले की, गावांचा एकोपा आणि ग्लोबल विकास ट्रस्टचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी आणि देशाचा विकास व्हावा यासाठी टाटा ट्रस्ट नेहमी सहकार्य करेल. दुष्काळाकडून समृद्धीकडे चाललेला प्रवास खरोखरच कौतुकास्पद असून, ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाची व्याप्ती देशभर व्हावी असा मानस त्यांनी व्यक्त केला.

पांडुरंग वाकसे (शेतकरी) म्हणाले की, ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्हाला भरपूर मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे आम्ही फळबाग लागवडीतून एकरी लाखांचे उत्पन्न घेत आहोत. पाण्याचा कायम दुष्काळ असलेल्या आमच्या गावातील सरस्वती नदीचे पुनरुज्जीवन होत असल्यामुळे आता आमच्या शेतीसाठी मुबलक पाणी मिळेल अशी आशा आहे. शाश्वत पाण्यासाठी गावातील सर्व समाजघटक एकत्र आले आहेत. या उपक्रमाने केवळ पाणीच नाही, तर मनेही जोडली आहेत.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडवणी येथे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा




वडवणी । प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्व.महिपतराव गणपतराव कोठुळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडवणी आणि सामाजिक वनीकरण विभाग बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम दि.०५ जून रोजी आयटीआय वडवणी येथे आयोजित करण्यात आला होता.

हा कार्यक्रम लखमावाड साहेब विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण,बीड तसेच बिराजदार साहेब सहाय्यक वनसंरक्षक सामाजिक वनविभाग,बीड व आयटीआय वडवणीचे प्राचार्य बनगे एस.ओ. यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षरोपण करून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा महत्त्व,झाडांचे मानवी जीवनात योगदान,वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एस.डी.वायभाये (वनपाल), श्रीमती डी.आर.शिंदे,वनरक्षक श्री.एल.जी. बरखडे,श्री.राठोड एस.एल. ,श्री.मोमीन एम.एच.,कुमारी ठोंबरे एस.डी. ,श्री.मंदे के.एस.,श्री.मुळे के. एस.,श्री.पोठोळे सर,श्री.केदार एम. बी.,अशोक आंधळे यांच्यासह प्रशिक्षणार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### विविध सामाजिक उपक्रमांनी

जिव्हाळा आश्रम तसेच ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्पात भव्य अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात शिवसैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, किराणा किटचे वाटप करण्यात आले, तर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणही करण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये हजारो नागरिक, शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक आणि स्नेहीजन सहभागी झाले होते. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करताना अनिलदादा जगताप यांनी समाजोपयोगी कार्यांमधून जनसेवा करण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याची भावना व्यक्त केली.

### मुजोर रिक्षाचालकांवर वाहतूक

करणे, वाहनांची आवश्यक कागदपत्रे नसणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणे तसेच फिटनेस व विमा नियमांचे उल्लंघन करणार्या वाहनांची तपासणी करण्यात आली. तसेच इन्शुरन्स नसणे, पीयुसी नसणे, परवाना संपलेले, विना परवाना, नो पार्किंग या सदराखाली मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली. शहरातील प्रमुख चौक असलेले मुख्य ठिकाण छत्रपती शिवाजी महाराज चौक, अण्णाभाऊ साठे चौक, बसस्थानक परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी ही संयुक्त मोहीम राबविण्यात आली. यावेळी वाहतूक शाखेचे अधिकारी, कर्मचारी तसेच आरटीओ विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि वाहतूक व्यवस्थेत शिस्त निर्माण करण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सांगितले. आम्ही शपथ घेतो की वाहतुकीचे नियम पाळूयात तसेच नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेवू अशी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी वाहनधारकांना शपथ दिली. वाहनचालकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवून वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा जिल्हा वाहतूक शाखेने दिला आहे. या कारवाईमुळे अवैध प्रवासी वाहतुकीला आळा बसण्यास मदत होणार असून वाहनांचे नियम पाळणार्या नागरिकांतून या मोहिमेचे स्वागत केले आहे.

### भाजपा ज्येष्ठ नेते नवनाथ

असल्याचे सांगण्यात आले. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करता, दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीमागे इतर कारणांचा संबंध असू शकतो, असा युक्तिवाद बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडला. मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, उपलब्ध कागदपत्रे आणि प्रकरणातील परिस्थितीचा प्राथमिक विचार करून श्री. नवनाथ शिराळे पाटील यांना अटी व शर्तीसह अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात श्री. नवनाथ शिराळे पाटील यांच्या वतीने अ‍ॅड. एस. बी. नांदे व अ‍ॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

### दहा हजारांची लाच

होमगार्ड रशिद दगडूखा पठाण याच्याकडे देण्यास सांगितली. तक्रारदाराकडून पंचांसमक्ष १०,००० रुपयांची लाच स्वीकारताना होमगार्ड रशिद पठाण याला एसीबीच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले.

मोबाईल आणि रोकड जप्त, घरझडती सुरू एसीबीने आरोपींची अंगझडती घेतली असता, हवालदार बळवंत याच्याकडे २ मोबाईल व २५०० रुपये, तर होमगार्ड रशिद पठाण याच्याकडे लाचेचे १०,००० रुपये, वैयक्तिक २५०० रुपये आणि १ मोबाईल आढळून आला. दोन्ही आरोपींचे मोबाईल जप्त करण्यात आले असून, त्यांच्या घरांची झडती ( ) घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, गुन्हा दाखल झाल्यानंतर दोन्ही आरोपींना रीतसर अटक करण्यात येणार आहे. ही यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली, सापळा अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक बाळू संपती जाधवर, तपास अधिकारी पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे तसेच पोलीस अंमलदार गजानन घायवट, गणेश चेके, भुतेकर, गजानन कांबळे आणि चालक बिनोरकर (सर्व रा. ला.प्र.वि. जालना) यांच्या पथकाने केली.

### 'वडाचे गाव' ही ओळख

ग्रामस्थांची अपेक्षा आहे. या उपक्रमात सचिन वाणी, विक्रांत वाणी, सर्पमित्र अशोक जाधव, सय्यद अख्तर, पत्रकार हरिओम क्षीरसागर, बबलू शिंदे, शुभम मंडलिक, रोहित जाधव, भाऊसाहेब वाणी, ओंकार थोरात, शहाजी फाळके आदींनी पुढाकार घेतला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बोलताना डॉ. गणेश ढवळे यांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित केली. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि पाण्याचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून, भावी पिढ्यांसाठी सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी पर्यावरणाचे संतुलन राखणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# उसाची बिलं थकविणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करायची सोडून साखर निर्यातबंदी

## शेतकऱ्यांची सर्व बाजूंनी लूट

पुणे / प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ७० टक्के कारखाने मंत्री, आमदार, खासदार व नेत्यांचेच आहेत. उसाची एफआरपी थकवलेल्या कोणत्याही सहकारी अथवा खासगी कारखान्यांवर कारवाई केलेली नाही.

उलट साखर निर्यातबंदी, साखरेचे एसएमपी वाढवून न देता उसाची एफआरपी वाढवून जाहीर करणे म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची लूट आहे, असा आरोप शेतीमित्र अशोकराव थोरात यांनी सरकारवर केला आहे. थोरात यांनी दिलेल्या पत्रकानुसार, भारतातील साखरेचा मागील वर्षाचा हंगाम नुकताच संपला आणि केंद्र सरकारने पुढील पाच महिन्यांसाठी साखर निर्यातबंदी जाहीर केली. गेल्या पाच वर्षांत साखरेची कमीत कमी आधारभूत किंमत गेली सात वर्षे वाढवलेली नाही. ती फक्त ३२ रुपये किलोने साखर कारखान्यांना मिळते. याउलट साखर उत्पादन खर्च वाढलेला आहे. तर उसाचा उत्पादन खर्च तिपटीने वाढलेला आहे. अशा परिस्थितीत देशांतर्गत साखर पडून राहणार. साखर विकली जात नाही म्हणून कारखाने केंद्र व राज्य सरकारकडे बोट दाखवून केंद्र सरकारने जाहीर केलेली दहा टक्के उताऱ्याची ३६० रुपये प्रतिक्विंटल एफआरपी वेळेवर देणार नाहीत. याचाच अर्थ देशातील व विशेषतः महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरीत जाणार. ऊस लागणीपासून ते काढणीपर्यंत होणारा वाढीव खर्च आणि याबरोबरच ऊस तोडणीच्या वेळी मुकादम व टोळीला वरून पैसे द्यावे लागतात. स्वतःच्या ट्रॅक्टरने जेसीबीने गाडी बाहेर काढावी लागते. इतके करूनही कारखान्यांचा साखर ऊस वजनकाटा शेतकऱ्यांच्या पायात किती खोलवर घुसेल हे सांगता येत नाही. तसेच उसाची रिकव्हरी किती लागली व लागेल, हे फक्त चीफ केमिस्ट, मॅनेजिंग डायरेक्टर यांनाच माहीत असते. त्यामुळे कारखाना स्तरावर अधिक लूट होत असते. त्यात केंद्र सरकारचे अस्थिर निर्यात धोरण, इथेनॉल निर्मितीचे धोरण, इथेनॉलचे दर यामुळे अंतिमतः ऊस उत्पादक शेतकरी तोट्यात येतो. आता तर पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या काटकसरी धोरणामुळे येत्या हंगामात साखरेला, उसाला योग्य दर मिळेल का? अशीच शंका आहे.





## या विदेशी जातीच्या शेळ्या दररोज देतात ५ लिटरपर्यंत दूध



३ विदेशी जातींच्या शेळ्यांची माहिती देणार आहोत ज्यांची प्रति दिवस दूध उत्पादन क्षमता स्थानिक गायीएवढे आहे. या जातीच्या शेळ्यांचे पालनपोषण करून पशुपालक चांगले पैसे कमवू शकतात, कारण या जातीच्या शेळ्यांच्या दुधाला आणि तुपाला बाजारात जास्त मागणी आहे.

भारतात शेळीपालन अतिशय वेगाने वाढणारा कृषिपूरक व्यवसाय आहे. या व्यवसायातून दूध, खत आणि इतर कृषी उत्पादने मिळतात. परंतु शेळीपालनात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, कारण त्यांना शेळ्यांच्या चांगल्या जातींची योग्य माहिती नसते. आज आम्ही तुम्हाला विदेशी शेळ्यांच्या जातीची माहिती देणार आहोत ज्या चांगले दूध उत्पादन देतात.

अँग्लो न्यूबियन शेळी : शेळीपालनातून चांगले उत्पन्न मिळविण्यासाठी तुम्ही अँग्लो न्युबियन जातीची शेळी पाळू शकता. ही एक परदेशी जात आहे, जी युरोपमध्ये मोठ्या प्रमाणावर पाळली जाते. शेळीची ही जात उच्च दूध उत्पादन आणि मांसासाठी ओळखली जाते. अँग्लो न्युबियन शेळी एका दिवसात सुमारे ५ लिटर दूध देऊ शकते. या जातीच्या शेळ्या खूप उंच असून त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. अँग्लो न्युबियन शेळ्यांचे संगोपन करून शेतकरी दूध आणि मांस विकून कमी वेळात भरपूर कमाई करू शकतात.सानेन शेळी : स्वित्झर्लंडमध्ये पाळण्यात येणाऱ्या सानेन शेळीची जात दुग्ध उत्पादनासाठी खूप लोकप्रिय आहे. ही शेळी इतर जातीच्या शेळ्यांच्या तुलनेत भरपूर दूध देते. सानेन शेळी एका दिवसात सुमारे ४ लिटर दूध देऊ शकते. या जातीच्या शेळ्यांचे मांसही उच्च दर्जाचे असते. बाजारात त्याच्या मांसाला चांगली मागणी आहे, त्यामुळे त्याचे दरही चढेच आहेत. या जातीच्या शेळ्या जन्मानंतर ९ महिन्यांनंतरच गर्भधारणेसाठी तयार होतात. टोगेनबर्ग शेळी : टोगेनबर्ग शेळी देखील स्वित्झर्लंडमध्ये पाळल्या जाणाऱ्या जातींपैकी एक आहे. या शेळीचे वैशिष्ट्य म्हणजे तिला शिंग नसतात. टोगेनबर्ग शेळी एका दिवसात ४ ते ४.५ लिटर दूध देते. या जातीच्या शेळ्या खूप सुंदर दिसतात, म्हणून बहुतेक लोक त्यांना त्यांच्या घरात पाळीव प्राणी म्हणून ठेवतात. टोगेनबर्ग शेळीचा रंग तपकिरी आणि पांढरा आहे.

## शेतात गाळ टाकताना अशी घ्या काळजी

शेताची सुपीकता टिकवण्यासाठी शेतकरी त्यामध्ये शेणखत, लेंडी खत, गांडूळ खत यांचा पुरेपूर वापर करतात. यामध्ये बरेच शेतकरी धरणातील किंवा तलावांमधील पाणी कमी झाल्यानंतरत्यातील गाळ आपल्या शेतात टाकतात. तसे पाहायला गेले तर गाळ माती टाकण्याचे खूप महत्त्वपूर्ण फायदे आहेत. गाळ माती शेतात टाकल्याने जमिनी दर्जेदार व सुपीक होते व महत्त्वाचे म्हणजे ओलावा साठवून ठेवण्याची क्षमता सुद्धा वाढते. गाळामध्येविविध प्रकारचे नैसर्गिक अन्नद्रव्य तसेच सेंद्रिय पदार्थव चिकणमातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते.त्यामुळे असा गाळ शेतासाठी वपर्यायाने चांगल्या उत्पादनासाठी खूप महत्त्वाचा आहे. परंतु गाळ टाकतानाकाही काळजी सुद्धा घ्यावी लागते व प्रत्येकच गाळ माती ही शेतात टाकायला योग्य नसते.

गाळ माती वापरताना घ्या ही काळजी : शेतात जर गाळ टाकायचा असेल तर तो मार्च ते मे महिन्यामध्ये जमीन कोरडी पडते तेव्हा साठवण पद्धतीने गाळ माती काढून शेतात पसरून घ्यावी. फळबाग लागवड करायची असेल तर खड्डा खोदून किंवा शेताचा उतार ज्या दिशेस असेल त्यानुरूप चर खोदून त्यात गाळ माती भरावी. जमिनीत गाळ काढताना हलक्या व ज्या जमिनीची पाणी धारण क्षमता कमी आहे अशा जमिनीत गाळ मातीचा वापर करावा. जमिनीतील चिकन मातीचा प्रकार कोणता आहे त्यानुसार गाळ मातीची मात्रा ठरवावी.

या प्रकारची गाळ माती शेतात टाकू नये : गाळ मातीचा सामू साडे आठ पेक्षा जास्त असेल तर अशा मातीचा उपयोग करू नये. पाणी साठवण पद्धतीच्या काठावरची माती शेतात पसरवण्यासाठी वापरू नये. चुनखडी असलेली गाळ माती शेतात वापरू नये.आशा गाळ मातीचा जमिनीतील अन्नद्रव्यांचा विपरीत परिणाम होतो व पिकांची उत्पादकता घटते. योग्य प्रमाणात गाळ मातीचा वापर करणे महत्त्वाचे आहे तरच त्याचा फायदा होतो नाहीतर फायदा होण्याऐवजी पिकांना नुकसान होण्याचा धोका संभवतो. गाळ मातीचा वापर करताना जमिनीचा प्रकार, जमिनीचा सामू तसेचतिच्या रासायनिक व भौतिक गुणधर्म यांचा विचार करणे गरजेचे आहे.

शेतात गाळ टाकण्याचे फायदे : तलाव किंवा धरणात जमा झालेल्या गाळ माती मध्ये अन्नद्रव्य आणि चिकणमातीचे प्रमाण जास्त असते व पिकांना त्याचा फायदा होतो. पिकांच्या सदृढ वाढीसाठी व चांगल्या उत्पादनासाठी गाळ माती उपयुक्त ठरते. गाळ माती जमिनीतील पाणी साठवून ठेवण्याची क्षमता वाढवते.

हलक्या व मध्यम प्रतीच्या जमिनीत गाळ माती टाकली तर अशा जमिनीची सुपीकता वाढते व पीक चांगले येते. गाळ जमिनीत टाकल्यास जमिनीतील स्फुरद, सेंद्रिय कर्ब व पालाश तसेच अन्नद्रव्यांचे प्रमाण वाढते.



## उसाच्या पाचटापासून गांडूळ खत, पिकांना होईल फायदा

शेती आणि खते यांचा परस्पर संबंध खूप घनिष्ठ आहेत. खतांशिवाय शेती शक्यच नाही. शेतकरी पिकांपासूनभरघोस उत्पादन मिळावे यासाठी रासायनिक खतांचा वापर करतात.परंतु रासायनिक खतांचा भरमसाट वापर यामुळेपर्यावरणाचे संतुलन बिघडलेच परंतु जमिनीचा पोत ढासळण्याची देखील मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. तसेच मानवी आरोग्यावर देखील रासायनिक खतांचा भरमसाट वापर याचा दुष्परिणाम पाहायला मिळतो. या सगळ्या गोष्टींवर उपाय म्हणजे सेंद्रिय खतांचा जास्तीत जास्त वापर करणे हाहोय.शेतकरी तसे शेणखत, कंपोस्ट खताचा मोठ्या प्रमाणात वापर आता करू लागले आहेत. परंतु शेतामधील पिकांचे उरलेल्या अवशेषांचा वापर करून देखील चांगल्या पद्धतीने खत निर्मिती करता येते.

उसाच्या पाचटापासून गांडूळ खत निर्मिती : जागेची निवड व शेड बांधणी - गांडूळ खत निर्मिती करण्यासाठी खड्ड्यावर दिवसभर सावली राहावी यासाठी छप्पर करावे. त्यासाठीशेतात मिळणाऱ्या वस्तू जसे की लाकूड,उसाचे पाचट, बांबूइत्यादी साहित्यांचा वापर करावा. हे शेड उभारताना त्याची मधील उंची साडेसहा फूट, बाजूची उंची पाच फूट व रुंदी दहा फूट असावी. छपराची लांबीती आपल्याकडे किती पांचट उपलब्ध आहे यानुसार कमी जास्त होऊ शकते. छपराच्या मध्यापासून १-१ फूट दोन्ही बाजूस जागा सोडून चार फूट रुंदीचे व एक फूट उंचीच्या दोन समांतर वाफे वीट बांधकाम करून तयार करावेत व आतील बाजूने चांगल्या पद्धतीने प्लास्टर करून घ्यावे व खालील बाजूस कोबा करून घ्यावा. एक शेड तयार करताना जास्तीचे पाणी बाहेर काढण्यासाठी तळाशी पाईप टाकावा. वाफे तयार करण्याची दुसरी पद्धत म्हणजे वाफे जमिनीच्या वर बांधण्याऐवजी आठ ते नऊ इंच खोलीचे दोन समांतर चर काढावेत. खड्ड्यातील माती चांगली चोपून टणक करावी.



पाचट कुजवणे- खत तयार करण्यासाठी केलेल्या छपरा मध्ये खोदलेल्या चरामध्येतेव्हा वीट बांधकाम केलेल्या टाकीमध्ये उसाचे पाचट भरावे. त्याची उंची जमिनीपासून/ विट बांधकामापासून २० ते ३० सेंटिमीटर ठेवावी. पाचट भरतांना एक टन पाचटसाठी आठ किलो युरिया,दहा किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ताजे शेण खत १०० किलो वापरावे.नंतर या सगळ्या पदार्थांचे पाण्यात मिश्रण करून घ्यावे. पाचटाला पाच ते दहा सेंटिमीटर थर दिल्यानंतर त्यावर शेणखत, युरिया आणि सिंगल सुपर फॉस्फेट या द्रावणात पातळ थर द्यावा.

याचबरोबर पाचट कुजण्याची प्रक्रिया लवकर होण्यासाठी पाचट कुजविणारे संवर्धक एक टनास एक किलो या प्रमाणात प्रत्येक थरावर थोडेसे वापरावे. नंतर हा खड्डा पूर्ण भरल्यानंतर त्यावर पुरेसे पाणी मारावे वपाण्याने भिजवून घेतलेल्या पोत्याने झाडून टाकावे.

यावर दररोज पाणी मारत रहावे. असे एक महिना पाणी मारल्यानंतर पाचट अर्धवट कुजलेले दिसेल शिवाय उष्णता कमी झाल्याचे आढळून येते. असे अर्धवट कुजलेल्या १ टन पाचटासाठी दोन हजार हसीनिया फोटेडा जातीची गांडुळे सोडावी व हे गांडुळे सोडल्यानंतर सर्वसाधारणपणे अडीच ते तीन महिन्यांनी उसाच्या पाचटापासून उत्तम प्रतीचे गांडूळ खत तयार होते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ऍलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज व्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
२००० : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

## माळेगाव कारखान्याने दरवर्षीप्रमाणे २०० रुपये कांडे पेमेंट द्यावे-युगेंद्र पवार

माळेगाव / प्रतिनिधी

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्यावतीने दरवर्षी प्रतिटन २०० रुपये खोडकी (कांडे) बिल दिले जाते. जून महिन्यामध्ये नवीन ऊस लागवड करण्यासाठी व शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला हे खोडकी पेमेंट देण्याची माळेगावची परंपरा आहे. ही परंपरा कायम राहावी आणि ऊस उत्पादक सभासदांना पैसे मिळावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) युवा नेते युगेंद्र पवार यांनी केली.



याबाबत कारखान्याचे कार्यकारी संचालक अशोक पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कारखान्याचे माजी संचालक सुरेश खलाटे, तानाजी पोंदकुले, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त गणपत देवकाते, राजेंद्र काटे, श्रीहरी येळे, गौरव जाधव, सुशीलकुमार जगताप, नितीन तावरे, इंद्रसेन आटोळे, अजिंक्य वाघमोडे, अमित कोकरे, सिद्धार्थ गावडे, विक्रम आटोळे, विनय शेळके, रियाज सय्यद आदी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, कारखान्याचे कार्यकारी संचालक अशोक पाटील यांनी युगेंद्र पवार यांच्यासह शेतकऱ्यांनी कांडे पेमेंटसाठी केलेल्या मागणीचे निवेदन प्रशासनाला प्राप्त झाले आहे. ते निवेदन संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत चर्चेला ठेवले जाईल, अशी माहिती दिली आहे. माळेगाव साखर कारखान्याच्या प्रशासनाने गेल्यावर्षी गळीत हंगामात उसाला एफआरपी ३२६९ रुपये असतानाही प्रति टन ३३०० रुपये शेतकऱ्यांना अदा केलेले आहेत अशी माहितीही त्यांनी दिली. यावेळी कारखान्याचे अनेक सभासद व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# जलसंवर्धन ही काळाची गरज; युवकांनी पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

'जलदिंडी अभियानाचा' समारोप जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पाडळी (ता. बदनापूर) येथे उत्साहात संपन्न झाला. दि. १ ते ५ जून, २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानाद्वारे जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जलदान करून आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल उपस्थित होत्या. पाथ्रीकर कॅम्पसचे डॉ. देवेशजी पाथ्रीकर होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू, मयुरकुमार गोरमे, तहसीलदार अतुल बने, डॉ. रामदास निहाळ, अमृत तारो आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा तुळशीच्या रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढते जलसंकट, भूजल पातळीतील सातत्याने होत



असलेली घट आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम लक्षात घेता युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ''आजच्या बदलत्या हवामान परिस्थितीत जलसंवर्धन आणि जलसाक्षरता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. युवकांनी निसर्गाशी एकरूप होत पाणी बचत, वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि जलव्यवस्थापनाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जलसंपत्ती निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू यांनी युवकांना संबोधित करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलव्यवस्थापनाच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवकालीन किल्ले, तलाव, बंधारे आणि जलसाठवण व्यवस्था आजही जलसंवर्धनाचे आदर्श उदाहरण आहेत. आधुनिक काळातही त्या पद्धतींचा अभ्यास करून जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता आहे. यावेळी जलदिंडी अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला. पथनाट्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच विविध गावांमध्ये रॅली, जनजागृती फेऱ्या, संवाद सत्रे आणि प्रत्यक्ष प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मयुरकुमार गोरमे यांनी सांगितले की, जलदिंडी अभियान दि. १ ते ५ जून दरम्यान सोमठाणा, निकळक, अकोला, देवगाव, कुसळी, मात्रेवाडी, सेलगाव आणि पाडळी या गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आले. या अभियानाद्वारे युवक, महिला, शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये जलसाक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## भगवंताच्या नामस्मरणामध्ये जीवनातील दुःख व चिंता दूर करण्याची ताकद -समाधान महाराज



मंठा। प्रतिनिधी

भगवंताच्या नामस्मरणामुळे मनुष्याला काम, क्रोध, लोभ, मत्सरापासून कायमची मुक्ती मिळते, जीवनातील दुःख व चिंता दूर करण्याची खरी ताकद नाम संकीर्तनामध्ये आहे असा उपदेश भागवताचार्य प. पू. समाधानजी महाराज शर्मा यांनी केला. श्रीक्षेत्र ढालेगाव येथे दाधिच महाकुंभातील श्रीमद्? भागवत कथेच्या पाचव्या दिवशी परमपूज्य श्री समाधान महाराज उपदेश करताना बोलत होते. अखिल भारत वर्षीय दाहिमा (दाधिच) ब्राह्मण महासंघ अंतर्गत दाधिच महासभा महाराष्ट्र यांच्या वतीने प.पू. स्वामीजी गोविंद देव गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेतून श्रीक्षेत्र ढालेगाव येथील सात दिवशीय दाधिच महाकुंभाची रविवारी उत्साहात सांगता होणार आहे.


प. पू. समाधानजी महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून '' भक्तो के राजा शाम मेरे आजा ''या भजनावर भाविक तल्लीन होऊन नाचत होते. भगवंताचे नामस्मरण, उपासना, साधना, तपश्चर्या केल्याचे फळ निश्चित भेटते असा उपदेश केला. यावेळी परमपूज्य महाराजांनी श्रीकृष्णलीला आपल्या अमृतवाणीतून विविध उदाहरणांसह सांगितली. आई वडील जिवंत असेपर्यंत त्यांची सेवा करा असा उपदेशही महाराजांनी केला. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दुपारी दाधिच परिवाराच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरण आणि नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या कार्यक्रमासाठी महाकुंभ आयोजन समितीसह विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. उद्या रविवारी ७ जून रोजी दाधिच महाकुंभाची सांगता होणार असून कथा श्रवणासह महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन दाधिच महाकुंभ आयोजन समितीसह दाधिच महासभा महाराष्ट्रचे संपूर्ण पदाधिकारी, विविध जिल्ह्यांचे पदाधिकारी, समन्वयक व इतर समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणीच्या मृत्यू प्रकरणी दोन आरोपींना पोलीस कोठडी

अंबड। प्रतिनिधी

शहरातील एका खासगी मत्स्योदरी अकॅडमीमध्ये पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या दहीगव्हाण खुर्द (ता. अंबड) येथील १९ वर्षीय प्रिती अंशीराम भाकड या तरुणीचा अंबड शहराजवळील वलखेडा शिवारातील एका खदानीतील पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. मयताचे नाव प्रिती अंशीराम भाकड वय १९ वर्षे व्यवसाय शिक्षण रा दहींगव्हाण खुर्द ता अंबड जि जालना. प्रिती अ भाकड ही मत्सोदरी अकॅडमी अंबड येथे पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण घेत असतांना तीला पोहता येत नाही हे माहित असतांना तसेच पोलीस भरती करीता मुलींना पोहण्याची कोणतीही अटी शर्ती नसतांना, बचावाची कोणतीही साधन सोबत/जवळ नसतांना देखील यातील आरोपीतांनी फिर्यादीची मुलगी प्रिती हीला वलखेडा शिवारातील खदानीमध्ये घेवुन जावुन त्यांना पाण्याचा कोणताही अंदाज नसतांना ओसाड ठिकाणी तीला पाण्यामध्ये पोहण्याची जबरदस्ती केली ज्यामुळे फिर्यादीचा मुलगी प्रिती भाकड हीचा मृत्यु होवु शकतो याची जाणीव असतांना देखील खदानीमध्ये पाठवीले ज्यामुळे ती मयत झाली आहे. त्यानंतर तीच्या मरणाबाबत आम्हाला कोणतीही माहिती दिली नाही व फोन बंद करुन ठेवला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून सदरील आरोपींना न्यायालयमध्ये हजर केले असता न्यायालयाने आरोपीला एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. याप्रकरणी मयत तरुणीचे वडील अंशीराम एकनाथ भाकड (रा. दहीगव्हाण खु., ता. अंबड) यांनी दिलेल्या जबाबानुसार



त्यांची मुलगी प्रिती ही मागील एक वर्षापासून शहरातील एका खासगी पोलीस भरती पूर्व मत्सोदरी प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत होती. ती अंबड येथील सुरंगेनगर किरायाने रूम करुन मैत्रिणीसोबत राहत होती. ती दररोज पहाटे ५ वाजल्यापासून प्रशिक्षणासाठी जात असून, सकाळी ८ वाजेपर्यंत ग्राउंडवर्क आणि त्यानंतर अभ्यासासाठी लायब्ररीत वेळ भागात नारायण दळवे यांच्याकडे घालवत असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. अकॅडमीच्यावतीने आज सकाळी नित्यप्रमाणे वर्क आउटसाठी ती अंबड शहरापासून ४ किमी अंतरावर असलेल्या वलखेडा शिवारात गेली होती. सरावा दरम्यान काही प्रशिक्षार्णी यांनी शिवारातील एका सरकारी खदानीत पोहण्याचा सराव सुरु केला. मात्र, खदानीच्या खोलीचा व पाण्याचा अचूक अंदाज न आल्याने प्रिती भाकड पाण्यात बुडू लागली. सोबतच्या प्रशिक्षणार्थी यांनी तिला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु त्यांना यश आले नाही. तिला तातडीने अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एल. नागरे यांनी तपासून तिला मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिध्देश्वर धुमाळ, पोलिस निरीक्षक संतोष घोडके यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी अंशीराम भाकड यांच्या फिर्यादीवरुन अकॅडमीचे संचालक गोकुळ बारवाल व ट्रेनर गणेश भागवत वायसे यांच्याविरुद्ध अंबड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १०५, ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे हे करत आहेत. मयत प्रिती हिच्या पश्चात आई, वडील एक भाऊ व एक बहीण असा परिवार असून, या दुर्दैवी घटनेबद्दल दहीगव्हाण व परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. प्रितीचे खाकी वर्दीचे स्वप्न राहिले अधुरेचं अंबड तालुक्यातील खेडेगावातून खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न सोबत घेवून पोलीस भरती प्रशिक्षण घेण्यासाठी शहरात आलेली १९ वर्षीय प्रिती आपल्या खाकी वर्दीच्या स्वप्न पुर्तीसाठी पुरेपूर मेहनत करून अभ्यास करीत होती. पोलीस होवून आपल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर तीला आनंद पहायचा होता. मात्र, प्रशिक्षणा दरम्यानच काळाने तिच्यावर झडप घातल्याने तीचे खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न अपूर्णच राहिले आहे. या घटनेमुळे गाव परिसरात शोककळा पसरली आहे.

# आरोपी पावलस गायकवाड याने केला एलसीबी पथकावर गोळीबार

पाथर्डी । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील सराफ व्यापाऱ्याच्या दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर आरोपीने गोळीबार केल्याची थरारक घटना पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे घडली या गोळीबारात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र आरोपी पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड (रा.खरवंडी कासार ता.पाथर्डी) हा आपल्या साथीदारांसह घटनास्थळावरून पसार झाला आहे या प्रकरणी त्याच्यासह दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील सराफा व्यापारी अभिनंदन काशिनाथ पोद्दार यांना अडवून त्यांच्याकडील सोने लुटल्याप्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात आरोपी पावलस गायकवाड याच्यावर गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्याचा समांतर तपास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे या दरोड्यात पावलस उर्फ मेहेर गायकवाड याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आत्माराम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथक पाथर्डी येथे दाखल झाले पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या समन्वयाने खरवंडी कासार बीटचे पो.कॉ.आसाराम बटुळे व गृहरक्षक मिठू खेडकर यांची मदत घेऊन आरोपीचा शोध सुरू करण्यात आला गुरुवारी (दि.४ जून) रात्री सुमारे १०.३७ वाजता आरोपी आपल्या घरासमोर काही साथीदारांसह पाइपलाइनचे काम करत असल्याचे पोलिसांना दिसून आला पोलिसांनी सापळा रचून आरोपीला शरण येण्याचे आवाहन केले मात्र आरोपी पावलस गायकवाड याने पोलिसांचे आदेश धुडकावून लावत त्याने थेट पोलीस पथकाच्या दिशेने गोळीबार केला पिस्टल मधून फायर केलेली ही गोळी पो.कॉ.आसाराम बटुळे यांच्या अगदी जवळून गेल्याने मोठी दुर्घटना टळली यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने घरासमोर उभी असलेली पांढऱ्या रंगाची एक्सयूव्ही कार घेतली आणि आपल्या साथीदारांसह भरधाव वेगाने बीडच्या दिशेने पलायन केले घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू पोलिस निरीक्षक विलास पुजारी हे आपल्या पोलीस पथकांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकांना सूचना दिल्या या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड व त्याच्या दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलिसांवर गोळीबार करून फरार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी सोलापूर व अहिल्यानगर पोलिसांची संयुक्त मोहीम सुरू असून आहे.

### खरवंडी कासार उपनगर बनले गुंडांचे क्राईम हब ?

भगवानगड परिसरातील खरवंडी कासार हे उपनगर गेल्या काही वर्षात गुंडांचे क्राईम हब बनू पाहत आहे खरवंडी कासार परिसरातील काही युवक सध्या इन्स्टा फेसबुक सोशल मीडियाच्या कुख्यात गुंडांच्या रील्स पाहून गुंड बनण्याचा प्रयत्न करत आहेत खरवंडी कासार परिसरात जवळपास २५ ते ३० गावठी कट्टे व पिस्टल असल्याची गोपनीय माहिती आहे मध्यरात्री रोड रॉबरी करून लूटमार करणे मर्डर करणे आणि गुन्हेगारीच्या माध्यमातून पैसा कमावणे हे एकमेव ध्येय व ट्रेंड सध्या तरुणांमध्ये असल्याने खरवंडी कासार तरुणाई गुन्हेगारांचे क्राईम हब बनत चालल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे पोलिसांनी वेळीच गुन्हेगारीला आळा बसवण्याची गरज असल्याची भावना सामान्य नागरिक करत आहेत.

## वार्ड क्रमांक ३ मधील देशी दारूचे दुकान स्थलांतरित करण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरातील वार्ड क्रमांक ३ येथे असलेल्या देशी दारूच्या दुकानात नुकत्याच घडलेल्या गंभीर घटनेत एका युवकाचा मृत्यू झाल्यानंतर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. येथील वादग्रस्त देशी दारूचे दुकान स्थलांतरित करावे अशी मागणी नगरपंचायतच्या वतीने करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न तसेच परिसरात वाढत असलेल्या सामाजिक समस्यांचा विचार करून मंठा नगरपंचायतीने संबंधित देशी दारूचे दुकान अन्यत्र स्थलांतरित करण्याचा ठराव मंजूर केला आहे. याच अनुषंगाने नशामुक्त वार्ड अभियानांतर्गत नगराध्यक्ष वैजेनाथ बोराडे, नगरसेवक नितीन राठोड, नगरसेवक विकास सूर्यवंशी, समाजसेवक शेखलाल भाई, अजमत सय्यद व त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक श्रीमती ज्ञानेश्वरी आहेर यांना निवेदन देऊन ही मागणी केली आहे.



**अंबड : सब पोस्टमास्टर श्री. किरण गवरे यांची बदली जालना आर एस पोस्ट ऑफिस येथे झाली आहे.त्यानिमित अंबड पोस्ट ऑफिस स्टाफ कर्मचाऱ्याकडून गवारे यांना निरोप देण्यात आला.**

# वाळू माफिया आणि शासकीय कामात अडथळा करणाऱ्या ३ जणांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून व इतर ठिकाणांहून होत असलेल्या अवैध वाळू उत्खनन आणि शासकीय मालमत्तेच्या नुकसानीवर महसूल व पोलीस प्रशासनाने अत्यंत कडक पावले उचलली आहेत. तसेच शासनाची बोली बोलून रक्कम भरले नाही तसेच शासनाची बदनामी करून आत्मदहाच्या धमक्या देऊन सरकारी कामात अर्थाळा केला म्हणून पुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल , अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली वाळू माफियांविरुद्ध धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्या आणि शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या गुन्हेगारांवर गोंदी पोलीस स्टेशन येथे ३ स्वतंत्र फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या धडक कारवाईत महसूल विभागातील मंडळ अधिकारी श्री. कृष्णा येळके, तलाठी श्री. विश्वास ढवळे आणि तलाठी श्री. दीपक लव्हाळे यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे. मौजे कोठाळा खुर्द येथे बेकायदेशीर वाळू उत्खनन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. मौजे कोठाळा खुर्द (ता. अंबड) येथील गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे सुमारे ३०० ब्रास वाळूचे उत्खनन व चोरी केल्याप्रकरणी, गोपनीय माहिती व पंचनाम्याच्या आधारे खालील ४ वाळू माफियांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर सुभाष गुळवणे (रा. कोठाळा खुर्द) विजय विठ्ठल सोनवणे (रा. कोठाळा खुर्द) माउली अंजीत उबाळे (रा. कोठाळा खुर्द) गणेश बजरंग धाये (रा. कोठाळा खुर्द)या आरोपींवर भारतीय न्याय संहिता () २०२३ चे कलम ३०३(२) (चोरी) व २२३, तसेच खाण व खनिज अधिनियम १९५७ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या आरोपींनी यापूर्वीही वाळू चोरी केली असून त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत, मात्र त्यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्यामुळे त्यांच्यावर आता प्रतिबंधात्मक कारवाई व दंडात्मक वसुलीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मौजे हसनापूर येथे ट्रॅक्टर पळवून नेणे प्रकरणी दिनांक १४ मे २०२६ रोजी रात्रीच्या गस्तीदरम्यान मौजे हसनापूर येथील नदीपात्रात एक विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर (स्वराज ७४४) अवैध वाळू वाहतूक करताना महसूल पथकाने पकडला होता. सदर ट्रॅक्टर जप्त करून तहसील कार्यालयात आणत असताना, हसनापूर फाटा येथे एका स्विफ्ट कारमधून आलेल्या गुन्हेगारांनी शासकीय पथकाला अडथळा निर्माण करून ट्रॅक्टर पळवून नेला. या गंभीर प्रकरणाची दखल घेत खालील आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे: ओम विजय लांडगे (रा. गोंदी) - ट्रॅक्टर चालक पियुष पांडुरंग साळुंके (रा. गोंदी) - ट्रॅक्टर मालक यांच्यावर कलम ३०३(२), २२३ आणि सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. मौजे घुंगर्डे हादगाव येथे शासकीय जमिनीच्या लिलावात फसवणूक व धमक्या देण्यात आली मौजे घुंगर्डे हादगाव येथील गट क्र. २४५ मधील शासकीय जमिनीच्या लिलावामध्ये (एक साल लावणी हर्रासी) जाणीवपूर्वक दहशत निर्माण करून आणि शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी खालील २ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्जुन रामभाऊ वाघमारे (रा. भाग्यनगर गोंदी) हनुमंत रामभाऊ वाघमारे (रा. भाग्यनगर गोंदी)या आरोपींनी लिलावात सर्वाधिक बोली लावूनही शासकीय रक्कम भरली नाही, तसेच गावातील इतर लोकांना लिलावापासून परावृत्त केले. याशिवाय, आरोपींनी महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर खोटे आरोप करून त्यांची बदनामी केली आणि मंत्रालयात आत्मदहन करण्याच्या धमक्या देऊन प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. आरोपी हनुमंत वाघमारे याने सदर शासकीय जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणही केले आहे.

### महसूल प्रशासनाचा सक्त इशारा

उपरोक्त कारवायांवरून हे स्पष्ट होते की, महसूल प्रशासन आता अवैध वाळू वाहतूक आणि शासकीय कामातील हस्तक्षेपाबाबत 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबत आहे. यापुढेही तालुक्यातील इतर ठिकाणची गोपनीय माहिती गोळा करून बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर सक्त कारवाई केली जाईल.

## मंठा तालुक्यात 'आयुष्मान भारत इ-केवायसीसाठी विशेष मोहीम



मंठा। प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'आयुष्मान भारत जन आरोग्य योजने'चा लाभ तळागाळातील नागरिकांना मिळावा, यासाठी मंठा तालुक्यात ५ जून ते २० जून दरम्यान विशेष इ - केवायसी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचे नियोजन करण्यासाठी मंठा तहसील कार्यालयात तालुक्यातील सर्व रास्तभाव दुकानदारांची (रेशन दुकानदार) तातडीची बैठक संपन्न झाली.

या बैठकीला तहसीलदार सुमन मोरे, पुरवठा नायब तहसीलदार विकास राजपूत आणि पुरवठा निरीक्षक श्वेता टोकेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार सुमन मोरे यांनी सांगितले की, ''आयुष्मान भारत कार्ड '' नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. तालुक्यात एकही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहता कामा नये. सर्व रेशन दुकानदारांनी आपापल्या गावातील नागरिकांचे १००% इ केवायसी पूर्ण करून घ्यावे. असे सांगितले. पुरवठा नायब तहसीलदार विकास राजपूत यांनी तांत्रिक बाबींची माहिती दिली व दुकानदारांना कामात हलगर्जीपणा न करण्याचे आवाहन केले. तर पुरवठा निरीक्षक श्वेता टोकेकर यांनी मोहिमेच्या सनियंत्रणाबाबत रूपरेषा स्पष्ट केली. नागरिकांनी वरील कालावधीत आपल्या रेशन दुकानात जाऊन आधार कार्ड आणि रेशन कार्डच्या मदतीने आपले इ केवायसी करून घ्यावे, असे आवाहन तहसील प्रशासनाने केले आहे.

# शिवरायांच्या जयघोषाने दुमदुमले जामगाव; शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

## आ.सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या सिंहासनारूढ शिवमूर्तीसमोर अभिषेक; हजारो शिवभक्तांसाठी पंचपक्वान्न महाप्रसाद

आष्टी । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आष्टी तालुक्यातील जामगाव येथे आयोजित करण्यात आलेला भव्य शिवराज्याभिषेक सोहळा अभूतपूर्व उत्साह, भक्तिभाव आणि शिवमय वातावरणात संपन्न झाला. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला असून शिवप्रेमींच्या प्रचंड उपस्थितीमुळे जामगावने अक्षरशः रायगडाचे स्वरूप धारण केले होते.

आमदार लोकनेते सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून आणि जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या पुढाकारातून गावात रायगडावरील सिंहासनारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी मूर्तीसमोर शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विधिवत अभिषेक, पूजा-अर्चा आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला आमदार सुरेश आण्णा धस, ज्येष्ठ नेते देविदास आबा धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या शुभहस्ते शिवमूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील शिवभक्त, विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक दिवस नसून स्वाभिमान, राष्ट्रभक्ती, शौर्य



आणि जनकल्याणकारी प्रशासनाचा प्रेरणादायी संदेश देणारा दिवस आहे.

शिवरायांनी उभारलेल्या स्वराज्याच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमानिमित्त सरपंच राधेश्याम धस यांच्या वतीने जामगाव तसेच पंचक्रोशीतील हजारो शिवभक्तांसाठी पंचपक्वान्न महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. जात, धर्म, पंथ आणि पक्षभेद विसरून नागरिकांनी एकत्र येत महाप्रसादाचा लाभ घेत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. शिवरायांच्या पराक्रमाचे स्मरण, स्वराज्याच्या इतिहासाचे जतन आणि युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा जागविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या सोहळ्याच्या माध्यमातून घडून आले. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ उत्सव न राहता सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जाणीवा जागविणारा प्रेरणादायी सोहळा ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरपंच राधेश्याम धस, ग्रामपंचायत सदस्य, युवक मंडळे, शिवभक्त, ग्रामस्थ आणि सर्व सहकाऱ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

शिवराय हे नाव नाही, ती एक प्रेरणा आहे... स्वराज्य हा इतिहास नाही, ती आजही जगणारी विचारधारा आहे!यावेळी माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे माजी सभापती बद्रीनाथ जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य अमर राजे निंबाळकर आधी सह मोठ्या प्रमाणावर शिवभक्त उपस्थित होते.

# मुजोर रिक्षाचालकांवर वाहतूक शाखा व आरटीओची संयुक्त कारवाई

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई; वाहनचालकांमध्ये खळबळ

बीड । प्रतिनिधी

प्रभारी पोलीस अधिक्षक चेतना तिडके, अप्पर पोलिस अधिक्षक समीर शेख यांच्या आदेशाने तसेच जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) चे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धन्वे यांच्या सांगण्यावरुन मोटार वाहन निरीक्षक जगदीश चौधरी, सहाय्यक मोटार वाहन



निरीक्षक आश्विनी मोरे, महेश भोसले, चालक दराडे यांच्या संयुक्त विद्यमाने काल दि.५ जून २०२६ शुक्रवार रोजी बीड शहरासह परिसरात अवैधरित्या नियमांचे उल्लंघन करणार्या आणि प्रवासी वाहतूक करणार्या ॲटोरिक्षा आणि ॲपेरिक्षा आणि इतर वाहने अशा एकूण ४० वाहनांविरोधात कार्यवाही करण्यात आली असून २५ रिक्षाचालकांवर ९५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे यामुळे अवैध वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली आहे या कारवाईमध्ये जिल्हा वाहतुक शाखेचे कर्मचारी पोलीस हवालदार सखाराम घोलप, मनोज जायभाये, अजिनाथ मुंडे, फुलचंद जाधव, शेषनारायण गाडे, पोलिस अंमलदार संतोष मोरे, शुभम सानप, जिल्हा वाहतुक शाखेचे चालक दत्ता कदम व नारायण वाघमारे यांनी सहभाग नोंदवून कर्तव्य बजावले.

वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून परवान्याविना प्रवासी वाहतूक पान ३ वर

# भाजपा ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे पाटील यांना अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

भाजपा ज्येष्ठ नेते श्री. नवनाथ शिराळे पाटील यांना बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. दि. १५ मे २०२६ रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांनी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून आणि उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून अटी व शर्तींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला.

याबाबत सविस्तर वृत्त असे



की, दि. १५ मे २०२६ रोजी फिर्यादी सौ. शोभा अशोक आदमाने यांनी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात विनयभंग, मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीतील आरोप हे निराधार व वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचा दावा श्री. नवनाथ शिराळे पाटील यांच्या वतीने करण्यात आला.

अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने न्यायालयासमोर मांडले की, फिर्यादी व तिचे पती यांच्याशी जमीन व्यवहारासंदर्भात पूर्वीपासून आर्थिक स्वरूपाचे वाद प्रलंबित आहेत. फिर्यादी व तिच्या पतीकडे सन २०२२ मधील ०.०५ आर क्षेत्राच्या जमिनीसंदर्भातील इसार पावती दहा लाखाची असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच फिर्यादीच्या पतीने दिलेल्या धनादेशासंदर्भात वीस लाख रुपयांच्या निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयीन कार्यवाही सुरू असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

याशिवाय, इसार पावतीच्या आधारे संबंधित रक्कम अदा करणे अथवा जमीन खरेदीखत करून देण्याबाबतचा दावा देखील न्यायप्रविष्ट पान ३ वर

# दहा हजारांची लाच घेताना नेकनूर ठाण्यातील पोलीस हवालदार पकडला

नेकनूर । प्रतिनिधी

वडिलांच्या अपघाती मृत्यूच्या क्लेमसाठी आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना नेकनूर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार आणि एका होमगार्डला (खाजगी इसम) जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ माजली आहे.

दत्तात्रय साहेबराव बळवंत (वय ४१, पोलीस हवालदार, बक्कल नंबर १५४७, नेमणूक: पो. स्टे. नेकनूर, वर्ग ३) आणि रशिद दगडुखा पठाण (वय ५२, होमगार्ड, बक्कल नंबर ३५१ - खाजगी इसम) अशी लाचखोर आरोपींची नावे आहेत.


तक्रारदार (वय ४० वर्षे) यांच्या वडिलांचा ६ मार्च २०२६ रोजी शेतातून घरी पायी जात असताना एका मोटरसायकलने धडक दिल्याने अपघात झाला होता. बीड येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना तक्रारदाराच्या भावाच्या तक्रारीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. उपचार सुरू असताना २६ मार्च रोजी तक्रारदाराच्या वडिलांचा मृत्यू झाला.

वडिलांच्या अपघाताचा विमा (क्लेम) करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणण्यासाठी तक्रारदार हे वेळोवेळी नेकनूर पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस हवालदार दत्तात्रय बळवंत यांना भेटत होते. मात्र, बळवंत यांनी अपघाताची कागदपत्रे देण्यासाठी १५,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती १०,०००/- रुपये देण्याचे ठरले. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी या प्रकरणी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. तक्रारीच्या अनुषंगाने ३ जून २०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता, हवालदार दत्तात्रय बळवंत यांनी १०,००० रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज, दिनांक ६ जून २०२६ रोजी नेकनूर पोलीस ठाणे परिसरात सापळा रचण्यात आला. हवालदार बळवंत याने लाचेची रक्कम स्वीकारण्यास होकार देऊन ती रक्कम तिथेच कार्यरत असलेला पान ३ वर

# कॉ.सय्यद मुहामेद हुसेन यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मूळ रहिवाशी व सध्या बीड येथे वास्तव्यास असलेले ज्येष्ठ कम्युनिस्ट कार्यकर्ते कॉ.सय्यद मुहामेद हुसेन यांचे दि ०६ जुन शनिवार रोजी दीर्घ आजाराने वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले.ते कॉ. मुसद्दीक बाबा सर यांचे व दैनिक लातूर एक्सप्रेसचे मुख्य संपादक सय्यद मुजाहिद हुसेन यांचे ज्येष्ठ बंधू होते. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी वडील कॉ. हामेद हुसेन (मसलोद्दीन)यांच्या कमयुनिष्ट राजकीय विचार धारेवर ठाम राहून सामाजिक-राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्य केले.



त्यांचा अंत्यविधी बीड येथे झाला त्यावेळी शहरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते अनेक अधिकारी कर्मचारी पत्रकार उपस्थित होते. मरहुम मुहामेद हुसेन यांच्या पश्चात मुलगा स.जाहेद सर सह भाऊ बहीण मुली नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# ‘वडाचे गाव’ ही ओळख पुन्हा जिवंत करण्यासाठी लिंबागणेशकरांचा निर्धार

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात पूर्वी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावर वडाची भव्य झाडे दिसली की ‘लिंबागणेश गाव आले’ अशी ओळख होती. मात्र दोन-तीन दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसात लिंबागणेश बसस्थानकाजवळील सुमारे २५० वर्षे जुना महाकाय वटवृक्ष कोसळल्याने ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या असंख्य आठवणी या वटवृक्षाशी जोडलेल्या होत्या. पूर्वी गावात चार महाकाय वटवृक्ष होते. त्यापैकी आता ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील एकमेव वटवृक्ष शिल्लक राहिला आहे. निसर्गाचा अमूल्य ठेवा मानल्या जाणाऱ्या या वृक्षाच्या पडझडीमुळे पर्यावरण



संवर्धनाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

‘वडाचे गाव’ ही पुसट होत चाललेली जुनी ओळख नव्याने निर्माण करण्यासाठी ग्रामस्थ पुढे सरसावले असून, मोठ्या वडाच्या झाडांच्या फांद्यांची स्मशानभूमी, ग्रामपंचायत परिसर आणि बाजारतळ येथे लागवड करण्यात आली. भविष्यात या फांद्यांचे विशाल वटवृक्षांमध्ये रूपांतर होऊन गावाची ऐतिहासिक ओळख पुन्हा निर्माण व्हावी, अशी पान ३ वर

# दिड महिन्यांपासून रॉकेलची प्रतीक्षा

## पाटोदासाठी ५ हजार लिटरचा प्रस्ताव रखडला

पाटोदा । प्रतिनिधी

राज्यात पेट्रोल-डिझेल टंचाईच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा रॉकेल (केरोसीन) पुरवठा सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असला, तरी पाटोदा तालुक्याची तब्बल ५ हजार लिटर रॉकेलची मागणी दीड महिन्यानंतरही प्रतीक्षेत असल्याचे समोर आले आहे. एप्रिल महिन्यात करण्यात आलेल्या मागणीला अद्याप मंजुरी मिळालेली नसून, पुढील आठ ते दहा दिवसांत पाटोदा तालुक्यासाठी रॉकेल उपलब्ध होण्याची शक्यता असल्याची माहिती तालुका पुरवठा विभागाने दिली आहे.

राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने पूर्वीप्रमाणे परवानाधारक विक्रेत्यांकडून रॉकेल पुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर १४ मे रोजी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे पहिला रॉकेलचा टँकर दाखल झाला होता. मात्र, त्यानंतरही पाटोदा तालुक्यात अद्याप रॉकेल पोहोचलेले नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये प्रतीक्षा कायम आहे. तालुक्यात सध्या १ हजार ८५८ अंत्योदय कार्डधारक असून, रॉकेल वितरणात त्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात प्रत्येक अंत्योदय कार्डधारकास प्रत्येकी ३ लिटर रॉकेल देण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. यानुसार जवळपास संपूर्ण ५ हजार लिटरचा साठा अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांसाठी वापरला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पाटोदा तालुक्यात पूर्वी रॉकेल विक्रीचे परवाने असलेले १३१ परवानाधारक वितरक आहेत. शासनाकडून रॉकेलचा पुरवठा झाल्यानंतर केवळ याच परवानाधारक विक्रेत्यांमार्फत नागरिकांना वितरण केले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी गॅसची अडचण निर्माण झाल्यास पर्यायी इंधन म्हणून रॉकेल उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी वाहनांसाठी रॉकेल वापराबाबत चर्चा सुरू असली, तरी हा पुरवठा कोणत्याही परिस्थितीत वाहनांसाठी नसून केवळ स्वयंपाकासाठी पर्यायी इंधन म्हणूनच वापरण्याची परवानगी असेल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पाटोदा तालुक्यासाठी एप्रिल महिन्यात ५ हजार लिटर रॉकेलची मागणी करण्यात आली आहे. सध्या ती प्रक्रिया सुरू असून पुढील ८ ते १० दिवसांत रॉकेल उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सुरुवातीला अंत्योदय कार्डधारकांना प्रत्येकी ३ लिटरप्रमाणे प्राधान्याने वितरण केले जाईल. हा पुरवठा केवळ घरगुती वापरासाठी असून वाहनांसाठी वापरास परवानगी नाही. जर कोणी रॉकेलचा वापर वाहनांसाठी केलेला आढळला तर त्यावर प्रशासनाकडून कारवाईदेखील केली जाईल.

– सैफ.अय्युब.मुल्ला, पुरवठा अधिकारी,पाटोदा तालुका

# परळीतील मयत तौहीद खान यांच्या कुटुंबियांना न्याय मिळेल - धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील रहिवासी, आमचा तरुण भाऊ तौहीद खान याच्या दुर्दैवी व निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले असून याविषयी आपण सातत्याने पोलिस अधिकाऱ्यांच्या संपर्कात होतो; तोहिदच्या मारेकऱ्यांना शिक्षा होईल व खान कुटुंबीयांना न्याय मिळेल यादृष्टीने पुढील तपास व चार्जशीट दाखल करण्याबाबत पुढेही मी पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टद्वारे म्हटले आहे.

वैद्यकीय कारणास्तव आपण



मागील चार-पाच दिवस बाहेर असल्याने याबाबत व्यक्त होत आले नाही असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले असून, परळीत हिंदू-मुस्लीम सर्व समाज बांधव एकोप्याने मागील अनेक

### कुणीही प्रकरणाला धार्मिक रंग देऊ नये – धनंजय मुंडेंचे आवाहन

पिढ्यांपासून राहत आहेत. आमचा हा एकोपा बाधित होऊ शकत नाही त्यामुळे कृपया कोणीही या विषयाला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्टद्वारे केले आहे. दरम्यान मयत तौहीद खान यांस श्रद्धांजली अर्पण करत धनंजय मुंडे यांनी परळीत आल्यानंतर खान कुटुंबीयांची भेट घेणार असल्याचेही आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे.

# विविध सामाजिक उपक्रमांनी अनिलदादा जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा






बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त बीड मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून अभिष्टचिंतन करण्यात आले. रक्तदान शिबीर, अन्नदान, किराणा किट वाटप, वृक्षारोपण तसेच शालेय साहित्य वितरण यांसारख्या उपक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकी जपत शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी वाढदिवस साजरा केला.

बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यास विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व उद्योजक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून अनिलदादा जगताप यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी असंख्य महिलांनी एकत्रित येत ५६ दिव्यांनी औक्षण करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. वाढदिवसानिमित्त बीड शहरातील पान ३ वर

# खाकीतील धावपटूची दमदार झेप; पोलीस अंमलदार विलास इचके यांनी ४२ किमी फुल मॅरेथॉन सर केली

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी गावचे सुपुत्र तथा माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार विलास प्रल्हाद इचके यांनी आपल्या कर्तव्यासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करून पोलीस दलाचा मान उंचावला आहे. त्यांनी ३१ मे २०२६ रोजी अहिल्यानगर येथे पार पडलेल्या प्रतिष्ठित आणि आव्हानात्मक ‘हिस्टोरिक रन सीजन ५’ स्पर्धेत ४२ किलोमीटरची फुल मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली.



पोलीस दलातील व्यस्त आणि जबाबदारीच्या सेवेतून वेळ काढत, केवळ धावण्याच्या आवडीपोटी विलास इचके यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यांनी ४२ किलोमीटरचे अंतर अवघ्या ४ तास ४८ मिनिटे ०९ सेकंदांत पूर्ण करत फिनिशर सर्टिफिकेट प्राप्त केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे माजलगावसह उपळी परिसराचे नाव गौरवले गेले आहे.या स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर सायकलिंग क्लब आणि अहिल्यानगर ॲथलेटिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. ‘वसुधैव कुटुंबकम्’ या संकल्पनेवर आधारित या मॅरेथॉनला भारतीय सैन्य दल आणि फिट इंडिया यांचेही सहकार्य लाभले होते.विलास इचके यांच्या या यशाबद्दल माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास गात, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवळे, पोलीस उपनिरीक्षक सचिन शिंदे, पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड तसेच पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी, मित्रपरिवार आणि क्रीडाप्रेमींकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. खाकी वर्दीत राहून कर्तव्य बजावत असताना फिटनेस आणि आरोग्याबाबत जागरूकता जपत मिळवलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते हे विलास इचके यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकरी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26